बीड । मंगळवार
११.०३.२०२५
वर्ष : ४ अंक : ३३२
किंमत : ३ रु. पाने : ४

दैनिक ● www.marathwadapatra.com

# मराठवाडा पत्र

■ संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ■

dailymarathwadapatra2021@gmail.com RNI:Reg.NO.MAH/MAR/2021/80074 Post:Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-2027 Mob:9822152955 




# अजित पवारांनी मांडला महाराष्ट्राचा अर्थसंकल्प 'महत्वाच्या १३ घोषणा'



मुंबई । प्रतिनिधी

**महाराष्ट्राचे अर्थमंत्री आणि उपमुख्यमंत्री अजित पवार राज्याचा अर्थसंकल्प सादर करत आहेत. सुरुवातीलाच त्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि महाराष्ट्राच्या जनतेचे आभार मानले.**

अजित पवार अकराव्यांदा अर्थसंकल्प सादर करून, माजी अर्थमंत्री शेषराव वानखेडेंचा अर्थसंकल्प सादर करण्याच्या विक्रमाच्या जवळ पोहोचले. यापूर्वी शेषराव वानखेडे यांनी १३ वेळा, जयंत पाटील यांनी १० वेळा आणि सुशीलकुमार शिंदे ९ वेळा अर्थसंकल्प सादर केलाय. राज्याच्या महसुली स्थितीबाबत अर्थमंत्री अजित पवार यांनी सांगितलं की, राज्याची महसुली तूट ही सातत्याने स्थूल राज्य उत्पन्नाच्या एक टक्क्यापेक्षा कमी राहिली आहे. २०२५-२६ ची राजकोषीय तूट १ लाख ३६ हजार २३५ कोटी रुपये आहे.

अर्थसंकल्पातील महत्त्वाचे मुद्दे : महाराष्ट्रात देशी-परदेशी गुंतवणूक मोठ्या प्रमाणात, औद्योगिक विकासात राज्य अव्वल, जानेवारी २०२५ मध्ये दावोस येथे झालेल्या जागतिक आर्थिक परिषदेमध्ये महाराष्ट्र सरकारने एकूण ६३ कंपन्यांसोबत सामंजस्य करार केले, भारताच्या एकूण निर्यातीत महाराष्ट्राचं १५.४ टक्के वाटा, येत्या काळात महाराष्ट्रात १५ लाख ७२ हजार ६५४ कोटी रुपयांची गुंतवणूक होणार, मुंबई महानगर प्रदेश हे आंतरराष्ट्रीय दर्जाचे आर्थिक विकास केंद्र म्हणजेच 'ग्रोथ हब' म्हणून विकसित करण्याचा निर्णय, हातमाग विणकरांना प्रोत्साहन आणि सुविधा देण्यासाठी नागपूर येथे 'अर्बन हाट केंद्रां'ची स्थापना करण्यात येणार, रतन टाटा महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठाकडून मायक्रोसॉफ्ट कंपनीमार्फत १० हजार महिलांना कौशल्य व कृत्रिम बुध्दिमत्ता या विषयाचे प्रशिक्षण देण्यात येत आहे.



नवी मुंबई येथे २५० एकर क्षेत्रावर नाविन्यता नगर, इनोव्हेशन सिटी, उभारण्यात येणार आहे. हवामान बदल आणि समुद्राच्या पातळीत होत असलेल्या वाढीमुळे निर्माण होणाऱ्या नैसर्गिक आपत्तींपासून बचाव करण्यासाठी महाराष्ट्रातील किनारी जिल्ह्यांमध्ये ८ हजार ४०० कोटी रुपये किंमतीचा बाह्यसहाय्यित प्रकल्प राबविण्यात येणार आहे. ▶▶ उर्वरित पान २ वर

## २०२५-२६ साठी विभागनिहाय आर्थिक तरतुदी

१) बंदरे विभागास ४८४ कोटी रुपये
२) सार्वजनिक बांधकाम-रस्ते विभागास १९ हजार ९३६ कोटी रुपये
3) परिवहन विभागास 3 हजार ६10 कोटी रुपये
४) नगर विकास विभागास 10 हजार ६२९ कोटी रुपये
५) ग्रामविकास विभागास 11 हजार ४८0 कोटी रुपये
६) पर्यावरण व वातावरणीय बदल विभागास २४५ कोटी रुपये
७) ऊर्जा विभागास २1 हजार ५3४ कोटी रुपये
८) सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागास २५ हजार ५८1 कोटी रुपये
९) आदिवासी विकास विभागास २1 हजार ४९५ कोटी रुपये
10) इतर मागास व बहुजन कल्याण विकास विभागास ४ हजार 3६८ कोटी रुपये
11) दिव्यांग कल्याण विभागास 1 हजार ५२६ कोटी रुपये
1२) अल्पसंख्याक विकास विभागास ८1२ कोटी रुपये



*राज्य सरकारच्या वतीने अर्थसंकल्प मांडण्यात आला या अर्थसंकल्पामध्ये सामान्य माणसाला व शेतकऱ्यांना सरकार दिलासा देईल असं वाटत होतं. परंतु या सरकारने सामान्य माणसाच्या तोंडाला पान पुसण्याचे काम केले आहे. निवडणुकांमध्ये वाटेल त्या घोषणा करणारे सरकार अपयशी ठरले आहे. शेतकऱ्यांना संपूर्ण कर्ज मुक्ती देऊं विज बिल माफ करूं अशा घोषणा करणारे सरकार राज्यामध्ये सुरू असलेल्या विविध विकास कामासाठी देखील या अर्थसंकल्पामध्ये तरतूद झाली नाही.प्रत्येक खात्यामध्ये कट मारलेला आपल्याला दिसून येत आहे. - राजेंद्र मस्के, जिल्हाध्यक्ष - राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्ष बीड जिल्हा*



*अर्थमंत्र्यांनी सादर केलेला अर्थसंकल्प म्हणजे फक्त पोकळ घोषणा असून या अर्थसंकल्पातून शेतकऱ्यांच्या तोंडाला पाने पुसणारा हा अर्थसंकल्प आहे.या महायुती सरकारने आपल्या जाहीरनाम्यात दिलेला एकही शब्द पाळला नाही. शेतकऱ्यांना सरसकट कर्जमाफीची केलेली घोषणा हवेतच राहीली. बेरोजगार युवक महीला यांच्यासाठीही या अर्थसंकल्पातून काहीच तरतूद केलेली दिसत नाही विशेषता मराठवाड्यातील सिंचनासाठी ही भरीव आर्थिक तरतूद केली नाही. या महायुती तीघाडी सरकारने जनतेची पुर्णपणे निराशा केलेली असून, सर्व सामान्यांसाठी हा अर्थसंकल्प म्हणजे राजा उदार झाला आणी हाती भोपळा दिला अशी या सरकारची गत झालेली आहे.- शिवसेना जिल्हाप्रमुख बीड परमेश्वर सातपुते (उध्दव बाळासाहेब ठाकरे शिवसेना).*

# मारहाणीत तरुण मरण पावला समजून रोडवर फेकले; बीडमधील आणखी एक थरारक घटना

बीड । प्रतिनिधी

केज तालुक्यातील मस्साजोगचे सरपंच यांची अपहरण करून हत्या केल्याचे प्रकरण ताजे असतानाच, शिरूर तालुक्यातील घाटशीळ पारगावातही अशीच घटना घडली आहे. माय-लेकाला बेदम मारहाण केली. नंतर तरुणाचे जीपम धून अपहरण करून त्याला वायर, रॉडने मारहाण केली.

तो मरण पावला म्हणून त्या तरुणाला रस्त्यावर फेकून दिले. ही घटना १ मार्च रोजी घडली होती. या प्रकरणी सहाजणांविरोधात २ मार्च रोजी गुन्हाही दाखल झाला आहे; परंतु या मारहाणीचा व्हिडीओ रविवारी व्हायरल झाला आहे. कृष्णा दादासाहेब घोडके (वय २५, रा. घाटशीळ पारगाव, ता. शिरूर कासार) व संजीवनी घोडके अशी जखमींची नावे आहेत. कृष्णा यांच्या फिर्यादीनुसार त्यांचा मोठा भाऊ गणेश घोडके हा पत्नी शीतलसोबत खोपोली (जि. पुणे) येथे राहत होता. ७ जानेवारी रोजी गणेश व शीतल यांच्यात वाद झाला आणि शीतलचा मृत्यू झाला. या प्रकरणात गणेश हा सध्या कारागृहात आहे. त्यानंतर १ मार्च रोजी सकाळी १० वाजता कृष्णा हे टरबूज पिकावर फवारणी करत असताना अंकुश तांबारे, मंगेश तांबारे, रावसाहेब तांबारे, भारत तांबारे (सर्व रा. जांब, ता. शिरूर कासार) हे लोक तेथे आले.




त्यावेळी अचानक अंकुश तांबारे याने त्याच्याकडील लोखंडी रॉडने, मंगेश तांबारे याने डीपीच्या वायरने रावसाहेब तांबारेने, लाकडी काठीने, भारत तांबारेने रबरी नळीने डोक्यात, पाठीवर, तोंडावर, पोटावर मारायला सुरुवात केली. त्यांपैकी अंकुश तांबारे याने 'गणेशला भेटायला कशाला गेला, त्याला वकील का लावला ?' असे म्हणत मारहाण केली. तेवढ्यात दादासाहेब बहीर यांनी तेथे संजीवनी घोडके यांना केस धरून ओढत आणते. त्यांच्यासोबत शिरू तांबारे हादेखील होता. या सर्वांनी संजीवनी यांनाही ▶▶ उर्वरित पान २ वर

# अनिलदादा जगताप यांच्या उपस्थितीत असंख्य कार्यकर्त्यांचा शिवसेनेत जाहीर प्रवेश



बीड । प्रतिनिधी

हिंदुहृदयसम्राट मा. बाळासाहेब ठाकरे, धर्मवीर आनंद दिघे साहेब यांच्या विचारांना प्रेरित होऊन तथा महाराष्ट्रा राज्याचे कर्तव्यदक्ष उपमुख्यमंत्री तथा शिवसेना मुख्य नेते मा. एकनाथ शिंदे आणि संसदरत्न खा. डॉ श्रीकांत शिंदे यांच्या नेतृवाखाली सुरु असलेल्या शिवसनेच्या दमदार अशा कार्यपद्धतीस प्रभावित होऊन ओबीसी व्ही जे एनटी सेना महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष बाळासाहेब जी किसवे साहेब आणि शिवसेना जिल्हा प्रमुख अनिलदादा जगताप यांच्या नेतृत्वाखाली

▶▶ उर्वरित पान २ वर

## एकनाथ शिंदे सर्वसामान्य जनतेच्या जीवनातील आशेचा किरण: अनिलदादा जगताप

**महाराष्ट्राच्या मातीतील कणखर नेतृत्व, सर्वसामान्य जनतेसाठी अहोरात्र झटणारे, गोरगरीब व अनाथांच्या जीवनातील आशेचा किरण, प्रखर इच्छाशक्तीने राज्याच्या प्रगतीसाठी सतत कार्यरत असलेले लोकनेते म हाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री तथा शिवसेना मुख्य नेते एकनाथजी शिंदे साहेब अठरा पगड जातीच्या कार्यकर्त्यांना सक्षम आधार आणि ताकद देणारे नेतृत्व आहे. उपमुख्यमंत्री शिंदे साहेब हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आणि धर्मवीर आनंद दिघे साहेब यांच्या विचारांचा रथ पुढे ओढण्याचं काम करत आहेत तर खा. डॉ श्रीकांत शिंदे साहेब देखील हाच वारसा जपण्यासाठी छोट्यातल्या छोटया कार्यकर्त्यांच्या सोबत राहून त्यांच्या समस्या अडचणी सोडवत आहेत. कार्यकर्ता या नात्याने आम्ही शिंदे साहेबांसोबत पूर्ण ताकदीने काम करतोय आता तुम्ही देखील आमच्याबरोबर एकजुटीने काम करा आणि पक्षाची ताकद वाढवा असे शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप यांनी उपस्थिती कार्यकर्त्यांना अहवान केले.**

# पिस्टल बाळगणारा पोलिसांच्या ताब्यात

## बीड स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई



बीड । प्रतिनिधी

बीड जिल्ह्या मध्ये मागील काही महिन्यापासून गावठी पिस्तूल बाळगणारे मोठ्या प्रमाणावर सापडत असून त्यावर कारवाई देखील होत असून ही पिस्तूल जिल्ह्यात पुरवठा कोण करत आहे याच्या मुळाशी जाणे व त्यावर वेळीच कारवाई होणे अपेक्षित आहे. दिनांक १०/०३/२०२५ रोजी इसम नामे ज्ञानेश्वर संजय सानप, वय २२ वर्ष, रा.वडझरी ता. पाटोदा जिल्हा बीड हल्ली मुक्काम जुना चऱ्हाटा रोड बीड हा स्वतःकडे एक गावठी पिस्टल कंबरेला लावून फिरत असले बाबत गोपनीय माहिती मिळाल्याने त्यास ताब्यात घेऊन त्याचेकडून एक गावठी पिस्टल जप्त करून पोलीस स्टेशन शिवाजीनगर येथे गु.र.न. १३३/२०२५ कलम ३/२५ आर्म क्ट प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

सदरची कारवाई पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत, अप्पर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर,पोलीस निरीक्षक उस्मान शेख, स्थानिक गुन्हे शाखा, बीड यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस

▶▶ उर्वरित पान २ वर




# दादा.. तुमच्या पालकत्व असलेल्या बीड जिल्ह्याच काय चुकलं ?



अर्थसंकल्प सादर होत असताना वाटत होतं या माझ्या बीड जिल्ह्याला विशेष असं काही गिफ्ट जिल्ह्याचे पालकमंत्री देतील.. म्हणून सकाळपासून अर्थसंकल्प घोषणांची वाट पाहत होतो.. अर्थसंकल्प सादरीकरण श्र्ळींश पाहण्याचा प्रयत्न केला.. विशेष असा एखादा उपक्रम बीड जिल्ह्याला मिळेल अशी आस लागलेली होती.. वाटलं होतं आत्ता नाव येईल नंतर नाव येईल मात्र तसं काही झालं नाही.. जिल्ह्याचे पालकमंत्री हे राज्याचे अर्थमंत्री असल्याने तिजोऱ्याच्या चाव्या आपल्याच हातात असल्याचं प्रत्येक बीडकरांना वाटलं होतं.. तिकडे पुण्या मुंबईला आदरणीय दादांनी विकासाची वाहती गंगा अजून भरभरून वाहू घातली त्यात काही आमची तक्रार नाही की निराशा नाही मात्र थोडेफार औद्योगिक विकासाच्या शिंतोडे बीड सारख्या मागासलेल्या जिल्ह्यावर फेकायचे ना दादा ? ? या जिल्ह्यात एखादं विद्यापीठ दिलं तर शैक्षणिक क्षेत्रात क्रांती झाली असती.. मेडिकल कॉलेज पण देता आले असते.. मराठवाड्यात पाणी वळवण्याच्या घोषणा नुसत्या होतात मात्र आंमलबजवनी काहीही होत नाही.. कालपरवा बीडच्या आमदार साहेबांनी एमआयडीसी मागणी केली होती किमान त्याची तरी घोषणा होणे अपेक्षित होते.. काहीही हाती लागलेले नाही.. दादा कसलाही वादा पाळला नाही..– धनंजय गुंदेकर, बीड

CMYK



# प्लास्टिक पिशव्यांवर बंदी काळाची गरज

काही दिवसांवर येणाऱ्या होळी आणि धुलिवंदनची धूम बच्चे कंपनीमध्ये आतापासूनच सुरु झाली आहे. होळीनिमित्त पाण्याने भरायचे फुगे आता दुर्मिळ झाल्याने गेल्या काही वर्षांपासून मुलांकडून जाडीने अत्यंत पातळ असणाऱ्या पिशव्यांचा फुग्यांप्रमाणे वापर केला जात आहे. दरवर्षी होळीच्या अनुषंगाने अशा पातळ पिशव्यांचा मोठ्या प्रमाणात वापर होत आहे. या पिशव्या फुटल्यावर त्यांचे तुकडे आहे तिथेच पडून राहतात. होळी आणि धुलीवंदनाच्या दिवशी रस्त्यांवर या पिशव्यांचा अक्षरशः खच पडलेला पाहायला मिळतो. याच पिशव्या हवेमुळे जवळच्या गटारांत आणि नाल्यांत जातात आणि पुढे जे व्हायचे तेच होते. दरवर्षी एवढ्या मोठ्या प्रमाणात या पिशव्या येतात कुठून हा प्रश्न त्यावेळी सर्वांनाच पडतो. प्लास्टिक पिशव्यांविरुद्धच्या मोहिमेअंतर्गत सरकारी कर्मचारी विक्रेत्यांवर कारवाई करतात; मात्र या कमी जाडीच्या पिशव्या ज्या ठिकाणी तयार केल्या जातात त्या कारखान्यांवर किंवा त्यांच्या घाऊक व्यापाऱ्यांवर सरकारी अधिकाऱ्यांकडून कारवाई केली गेल्याचे आजतागायत ऐकिवात नाही. त्यामुळे प्लास्टिक पिशव्यांविरुद्ध सरकारची अधूनमधून उघडली जाणारी मोहीम ही पर्यावरणाच्या रक्षणासाठी असते की केवळ दंडवसुलीतून महसूल मिळवण्यासाठी असा प्रश्न सामान्य नागरिकांना पडल्यावाचून राहत नाही. २६ जुलै २००५ या दिवशी झालेल्या मुसळधार पावसाने साऱ्या मुंबईची तुंबई करून टाकली. मुंबई नगरीत आलेल्या या महापुराने शेकडों निष्पाप नागरिकांचा बळी घेतला. अनेकांच्या घरात पाणी शिरून कोट्यवधी रुपयांची वित्तीय हानी झाली. या महाप्रलयामागील कारणमीमांसा तपासताना अतिक्रमणामुळे मिठी नदीचे अरुंद होत चाललेले पात्र, नाल्यांच्या साफसफाईतील अनियमितता, स्थानिक लोकप्रतिनिधींचा हलगर्जीपणा यासांसारख्या अनेक गोष्टींवर चर्चा झाली.



नाल्यांचा साफसफाईतील मोठा अडसर असतो तो प्लॅस्टिकच्या पिशव्यांचा. या प्लास्टिक पिशव्या गटारांच्या जाळ्या निकामी करतात. ५० मायक्रॉनपेक्षा कमी जाडीच्या पातळ पिशव्यांचा पुनर्वापर शक्य होत नाही. गटारांच्या जाळ्यांना असे पातळ प्लास्टिक चिकटल्यास पाण्याचा निचरा होत नाही. परिणामी पाणी बराच काळ बाहेर तुंबून राहते. जमिनीच्या तळाशी प्लास्टिक चिकटून राहिल्यास पाण्याचे नैसर्गिक स्रोत बंद होतात. कचऱ्याच्या ढिगाऱ्यातून अन्न शोधताना बऱ्याचदा प्लास्टिकच्या पिशव्या जनावरांच्या पोटात जातात ज्यामुळे त्यांचा जीवही जातो. पातळ प्लॉस्टिक पिशव्यांच्या संदर्भात नैसर्गिकरित्या कुजण्याची किंवा नष्ट होण्याची प्रक्रिया होत नसल्याने वर्षोनुवर्षे या पिशव्या तग धरून राहतात त्यामुळे अशा पातळ पिशव्यांवर बंदी घालणेच इष्ट असल्याचे लक्षात येऊन राज्यात ५० मायक्रॉनपेक्षा कमी जाडीच्या पिशव्यांवर कायद्याने बंदी घालण्यात आली. बंदी येताच सरकारच्या वतीने भरारी पथकांची नेमणूक करून प्लास्टिक पिशव्यांचे स्रोत असलेल्या किराणा मालाच्या, फळांच्या, भाज्यांच्या दुकानांवर धाडी टाकून ५० मायक्रॉनपेक्षा कमी जाडीच्या पिशव्या मोठ्या प्रमाणात जप्त करण्यात आल्या आणि त्या देणाऱ्या विक्रेत्यांवर दंडात्मक कारवाई करण्यात आली ज्यामधून सरकार दरबारी लाखोंचा महसूल गोळा झाला. सरकारच्या अन्य मोहिमांप्रमाणे ही मोहीमही काही दिवसांनी थंड पडली, पातळ पिशव्या पुन्हा बाजारांत भाजी, फळे, मासे विक्रत्यांकडे दिसू लागल्या. कालांतराने कोणीतरी न्यायालयात याचिका दाखल करून, सरकार दरबारी निवेदने देऊन किंवा विरोधी पक्षाच्या निदर्शनास आणून देऊन राज्यात प्लास्टिक पिशव्यांवरील बंदीचे कसे तीनतेरा वाजले आहेत ही बाब निदर्शनास आणून देते आणि पुन्हा एकदा सरकार खडबडून जागे होते. पुन्हा नव्याने कारवाईला सुरुवात होते. २००५ सालापासून आजतागायत प्लास्टिक पिशव्यांसह समस्त प्लास्टिक वस्तूंवर ६-७ वेळा बंदीची मोहीम उघडण्यात आली असून सहाही वेळा ही मोहीम काही कालावधी चालल्यानंतर पुन्हा बंद पडली आहे. १ जुलै २०२२ पासून राज्यात प्लास्टिक(काही अपवाद वगळता) आणि थर्माकोल यांवर कायमस्वरूपी बंदी आणण्यात आली आहे. काही वर्षांपूर्वी प्लास्टीकचा 'प' सुद्धा माहित नसणाऱ्या जगाला आज प्लास्टिकशिवाय जगणेही कठीण वाटू लागले आहे, त्यामुळे प्लास्टिकवरील बंदी यशस्वी होईल का याविषयी त्यावेळीच लोकांच्या मनात संभ्रम होता. सरकारच्या वतीने प्लॅस्टिकच्या सर्व वस्तूंना पर्यायही सुचवण्यात आले होते. त्या दरम्यान कापडी पिशव्यांना भलतेच महत्व प्राप्त झाले होते. पानाच्या टपऱ्यांपासून, वर्तमान पत्र विक्रेत्यांपासून ते हार्डवेअरच्या दुकानानांपर्यंत सर्वत्र कापडी पिशव्या विक्रीसाठी ठेवण्यात आल्याचे चित्र त्यावेळी पाहायला मिळत होते. ही मोहीमसुद्धा अपेक्षेप्रमाणे काही काळानंतर थंडावली. आजमितीला किराणा मालाचे दुकान, भाजीविक्रेता, फळ विक्रेता, मांस मटण विक्रेता, कापड विक्रेता, भांडी विक्रेता आदी सर्वांकडे प्लास्टिकच्या पातळ पिशव्या ग्राहकांना ना मागताही मिळू लागल्या आहेत. ट्रेन आणि एसटीमध्ये येणारे खाद्यपदार्थ आणि भाजी-फळ विक्रेतेही १०-१५ रुपयांच्या खरेदीवर या पातळ पिशव्या सहजपणे लोकांना बहाल करू लागले आहेत.

**– जगन घाणेकर, घाटकोपर, मुंबई**

पान ४ वरून पुढे...

## कैलास बोराडे...

हल्ला केला या घटनेची सदर घटना पुरोगामी महाराष्ट्र शोभणारी नाही या घटनेमुळे पूर्ण महाराष्ट्रात दहशतीचे वातावरण निर्माण होत आहे अशा स्वरूपाच्या घटना परत महाराष्ट्रात होऊ नये म्हणून सदर गुन्हेगारांना मकोका कायदा लावून फाशी शिक्षा देण्यात यावी .नसता महाराष्ट्रात जन आंदोलन उभे होईल

अशा घटना परत महाराष्ट्रात होऊ नये म्हणून सदर गुन्हेगारांना मकोका कायदा लावून फाशी शिक्षा देण्यात यावी. कैलास बोराडे मारहाण प्रकरण फास्टट्रॅक न्यायालय जलद गती चालवावे

तसेच आरोपींना कडक शासन करावे सर्व आरोपींना अटक करून कठोर शासन झालेच पाहिजे व व कैलास बोराडे यांच्या कुटुंबाला तातडीने २५ लाखाची आर्थिक मदत शासनाने करावी. अशी मागणी वडवणी तालुका धनगर जमात यांच्या वतीने वडवणी तहसीलदार यांना करण्यात आली आहे. या प्रसंगी शहाजी लोकरे, अंकुश तुरे, मारुती सरक, भाऊसाहेब गांडगे, सचिन काळे, बाबु गवळी सचिन प्रभाळे, नानवर, त्रिंबक श्रीमंत मुसळे, लहु गवळी दत्ता गवळी, महादेव तरटे, बाबुराव गांडगे, विठ्ठल खरात, संतोष वरकटे, पत्रकार राम चौरे, नवनाथ तुरे,नवनाथ सरगर, एकनाथ मदने, अड. खंडू काळे, राजेभाऊ गायकवाड, अशोक एकाळ, दत्ता चौरे, भगवान गायकवाड, सत्यप्रेम मोठे, नामदेव गायकवाड, खंडेराव मोठे, प्रवीण मोठे, कृष्णा मोठे, दत्तात्रय गायकवाड, दत्ता चौरे, इत्यादी समाज बांधव उपस्थित होते.

## संकल्प विद्या मंदिर...

योगेश्वरी च्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करण्यात आला.

दुसऱ्या व तिसऱ्या सत्रामध्ये पालक मेळावा, व शौर्यवान जवानाच्या धैर्यशील पत्नीचा व पतीच्या निधनानंतरही आपल्या पाल्याचे धैर्याने संगोपन करणाऱ्या धैर्यशील मातांचा सन्मान सोहळा अगदी उत्सवामध्ये संपन्न झाला. पहिल्या सत्रामध्ये अधिव्याख्याता डॉ. योगेश सुरवसे सर व ज्येष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी श्रीमती मुमताज पठाण मॅडम यांच्या उपस्थितीमध्ये संकल्प विद्या मंदिर शाळेला एक वेगळी ओळख निर्माण करून देणाऱ्या सर्व महिला शिक्षकांचा सन्मान सोहळा अगदी उत्सवात संपन्न झाला.

यावेळी श्रीमती मुमताज पठाण मॅडम व डॉ.योगेश सुरवसे यांनी शिक्षकांना महिला दिना शुभेच्छा देऊन मार्गदर्शन केले.

तर दुसऱ्या व तिसऱ्या सत्रामध्ये पालक मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते यामध्ये पालकांच्या अभ्यासक्रमातील अडीअडचणी समजून घेऊन त्याचे योग्य निरसन करण्यात आले ही पालक सभा अगदी खेळीमेळीच्या वातावरणामध्ये संपन्न झाली या पालक मेळाव्यातील उपस्थितीत शौर्यवान जवानांच्या धैर्यशील पत्नीचा व पतीच्या निधनानंतरही आपल्या पाल्याचे धैर्याने संगोपन करणाऱ्या धैर्यशील मातांचा सन्मान सोहळा संपन्न झाला.

या सोहळ्यातील तिन्ही सत्रातील समन्वयक म्हणून श्रीमती आव्हाड मॅडम, श्रीमती गुजर मॅडम, श्रीमती सुरवसे मॅडम श्रीमती चौधरी मॅडम, श्रीमती कुलकर्णी मॅडम, श्रीमती राऊत मॅडम यांनी कामकाज पाहिले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सर्व शिक्षक वृंद व विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले.

## बीडच्या रेशीम...

आणला जात असल्याची माहिती संचालक धनंजय गुंदेकर यांनी दिली आहे.

उन्हाळी दिवसांमध्ये आवक ही साधारणतः ५ ते १० टन दरम्यान असते मात्र गेल्या काही दिवसांत बीड येथील मार्केट मध्ये आवक प्रमाण मोठ्या प्रमाणात आहे. काल कमाल भाव हा ७३५ रुपये प्रति किलो असा होता. ८ दिवसांच्या आत शेतकऱ्यांचे पेमेंट त्यांच्या खात्यावर अदा केले जाते. रेशीम कोष खरेदी केंद्रातील सेवांबाबत बाजार समिती सभापती श्रीमती सरला कामराज मुळे, उपसभापती श्री शामसुंदर पडुळे, सचिव श्री जाधव, सर्व संचालक मंडळ व रेशीम विभागाचे सर्व अधिकारी कर्मचारी यांचे विशेष लक्ष असते. यामुळेच सध्या रेशीम खरेदी केंद्राबाबत रेशीम उत्पादक शेतकऱ्यांचा विश्वास वाढला असून आवक वाढत चालली असल्याचे संचालक धनंजय गुंदेकर यांनी म्हंटले आहे.

## ब्राह्मण समाज ....

आज उपनयन संस्कार करण्यात आले हा निश्चितच स्तुत्य व कौतुकास्पद उपक्रम असल्याचे देखील स्वामी यांनी सांगितले. प्रास्ताविकात बोलताना उपनयन संस्कार समितीचे अध्यक्ष डॉक्टर सचिन देशमुख म्हणाले की माजलगाव सारख्या ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणावर ब्राह्मण समाज संघटन करण्यात आलेले आहे सातत्याने सामुदायिक उपनयन संस्कार करून समाजाला दिलासा देण्याचे काम केले जाते हे करत असताना सर्व समाजाचे पाठबळ मिळत असल्यामुळेच हे शक्य होत असल्याचे त्यांनी सांगितले. सूत्रसंचालन हिमांशू देशमुख ,लता जोशी डॉ. प्रज्ञा जोशी, नंदकुमार कुलकर्णी, यांनी केले तर दत्ता महाजन यांनी आभार मानले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी उपनयन संस्कार समितीचे अध्यक्ष डॉ,सचिन देशमुख, अनंत शास्त्री जोशी, राजू पाठक,विनायक रत्नपारखी, बप्पासाहेब देशमुख दामोदर संधी कर अशोक कान्नापूरकर, चंद्रकांत देशमुख, मुकुंद जोशी व समस्त ब्राह्मण समाज बांधवांनी पुढाकार घेतला.

पान 1 वरून पुढे...

## अजित पवारांनी...

'राज्याचे लॉजिस्टिक धोरण-२०२४' जाहीर : १० हजार एकराहून अधिक क्षेत्रावर समर्पित लॉजिस्टिक पायाभूत सुविधांचा विकास करणार, यातून ५ लाख प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष रोजगारांची निर्मिती होणार आहे

ज्या तालुक्यांमध्ये बाजार समिती अस्तित्वात नाही, तेथे किमान एक स्वतंत्र बाजार समिती स्थापन करण्याचे ठरविण्यात आले आहे. त्यासाठी एक तालुका – एक बाजार समिती योजना राबविण्यात येणार आहे.

१) 'लाडक्या बहिणीं'ना आतापर्यंत दिले ३३ हजार कोटी

अजित पवार यांनी अर्थसंकल्प साद करताना माहिती दिली की, मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेंतर्गत सुमारे २ कोटी ५३ लाख लाभार्थी महिलांना जुलै, २०२४ पासून आर्थिक लाभ देण्यात येत आहे. त्यासाठी ३३ हजार २३२ कोटी रुपये खर्च झाला आहे.

२०२५-२६ मध्ये या योजनेकरीता एकूण ३६ हजार कोटी रुपये नियतव्यय प्रस्तावित आहे, असंही पवारांनी सांगितलं.

तसंच, या योजनेतून मिळणाऱ्या अनुदानाचा उपयोग काही महिला गटांनी आर्थिक उपक्रमासाठी बीज भांडवल म्हणून केला असून अशा गटांना आणखी प्रोत्साहन देण्यासाठी विशेष योजना हाती घेण्याचे विचाराधीन आहे, अशी माहिती अजित पवारांनी दिली.

२) छत्रपती संभाजी महाराजांच्या स्मारकाचे काम प्रगतीपथावर

अजित पवार यांनी अर्थसंकल्पातून सांगितलं की, छत्रपती संभाजी महाराजांचे पवित्र बलिदानस्थळ असलेल्या मौजे तुळापूर आणि समाधीस्थळ मौजे वढु बुद्रुक येथे त्यांच्या भव्य स्मारकाचे काम प्रगतीपथावर आहे.

दरवर्षी एका प्रेरणादायी गीताला 'छत्रपती संभाजी महाराज राज्य प्रेरणा गीत' पुरस्कार प्रदान करण्याचा निर्णयही शासनाने नुकताच घेतला आहे. तसंच, छत्रपती शिवाजी महाराज नजरकैदेत होते, तेथे भव्य स्मारक उभारण्याचे राज्य शासनाने ठरविले आहे. त्यासाठी उत्तर प्रदेश शासनाच्या सहकार्याने जागा उपलब्ध करुन घेण्यात येईल, असं अजित पवारांनी सांगितलं.

इतर स्मारकांबाबत अर्थसंकल्पातून दिलेली माहिती : भारताचे दिवंगत पंतप्रधान, भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त मुंबई येथे भव्य स्मारक उभारण्यात येणार आहे.

स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे राष्ट्रीय स्मारकाच्या पहिल्या टप्प्यातील काम पूर्ण झाले असून दुसऱ्या टप्प्यातील कामासाठी राज्य शासनाकडून २२० कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करुन देण्यात आला आहे.

आद्य शिक्षिका ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले यांचे जन्मगाव असलेल्या नायगांव, तालुका खंडाळा, जिल्हा सातारा येथे त्यांच्या कार्यास साजेसे स्मारक व महिला प्रशिक्षण केंद्र उभारण्यात येणार आहे.

चैत्यभूमी दादर, मुंबई येथे इंदू मिलच्या जागेवर भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे आंतरराष्ट्रीय दर्जाचे स्मारक उभारण्याचे काम सुरु असून त्यासाठी पुरेसा निधी उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

स्वराज्यासाठी बलिदान देणाऱ्या लाखो मराठ्यांच्या शौर्याचे प्रतिक म्हणून हरियाणातील पानिपत येथे यथायोग्य स्मारक उभारण्याचा निर्णयही आम्ही घेतला आहे. हरियाणा शासनाच्या मदतीने या स्मारकासाठी जागा उपलब्ध करुन घेण्यात येईल.

साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांचे जन्मस्थळ वाटेगांव, तालुका वाळवा, जिल्हा सांगली येथील स्मारकासाठी तसेच त्यांच्या नांवे प्रस्तावित चिरागनगर, मुंबई येथील संशोधन व प्रशिक्षण संस्थेसाठी पुरेसा निधी उपलब्ध करुन देण्यात येणार आहे.

३) '२०३० पर्यंत वाढवण बंदर सुरू होणं अपेक्षित'

अजित पवार यांनी अर्थसंकल्पातून सांगितलं की, जवाहरलाल नेहरु बंदर प्राधिकरण आणि महाराष्ट्र सागरी मंडळ हे संयुक्तरित्या पालघर जिल्ह्यात वाढवण बंदर विकसित करित आहेत. या प्रकल्पाचा एकूण खर्च ७६ हजार २२० कोटी रुपये असून त्यात राज्य शासनाचा सहभाग २६ टक्के आहे.

वाढवण बंदरामुळे सुमारे ३०० दशलक्ष मेट्रीक टन वार्षिक मालहाताळणी क्षमता निर्माण होणार आहे. जवाहरलाल नेहरु बंदराच्या सध्याच्या क्षमतेपेक्षा ती तिप्पट असणार आहे. सन २०३० पर्यंत नव्या बंदरातून मालवाहतूक सुरु होणे अपेक्षित आहे. या बंदराचा समावेश कंटेनर हाताळणी करणाऱ्या जगातील पहिल्या १० बंदरांमध्ये होणार असल्याने महाराष्ट्र राज्य भविष्यात सागरी दळणवळणातील महाशक्ती म्हणून उदयास येईल.

वाढवण बंदराजवळ मुंबईसाठी तिसरे विमानतळ प्रस्तावित असून मुंबई- अहमदाबाद बुलेट ट्रेनचे स्थानकही या बंदराजवळ असणार आहे. हे बंदर समृध्दी महामार्गालाही जोडण्यात येणार आहे.

४) गडचिरोलीला 'स्टील हब' बनवणार

गडचिरोली जिल्ह्याबाबत अर्थमंत्री अजित पवार यांनी विशेष उल्लेख करत म्हटलं की, एकेकाळी नक्षलग्रस्त म्हणून ओळखला जाणारा गडचिरोली जिल्हा आता 'स्टील हब' म्हणून उदयास येत आहे.

अजित पवार यांनी पुढे सांगितलं की, दावोस येथे झालेल्या जागतिक आर्थिक परिषदेमध्ये गडचिरोली जिल्ह्याकरिता २१ हजार ८३० कोटी रुपयांच्या गुंतवणूकीचे सामंजस्य करार करण्यात आले. त्यातून ७ हजार ५०० रोजगार निर्मिती होणे अपेक्षित आहे.

गडचिरोली जिल्ह्यातील दळणवळणासाठी खनिकर्म महामार्गांचे जाळे विकसित केले जात असून त्याकरिता पहिल्या टप्प्यात सुमारे ५०० कोटी रुपये किंमतीची कामे हाती घेण्यात येणार आहेत.

५) समृद्धी महामार्गालगत 'अॅग्रो-लॉजिस्टिक हब'

या अर्थसंकल्पातून हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे समृद्धी महामार्गाबद्दलही माहिती दिली.

समृद्धी महामार्गाचं ९९ टक्के काम पूर्ण झाले असून त्यासाठी ६४ हजार ७५५ कोटी रुपये खर्च झाला आहे. इगतपुरी ते आमणे हा ७६ किलोमीटर लांबीचा टप्पा लवकरच वाहतुकीसाठी खुला होईल, असं अजित पवारांनी सांगितलं.

तसंच, या महामार्गालगत अॅग्रो-लॉजिस्टिक हब विकसित केले जाणार असून त्यात कोल्ड स्टोरेज, ग्रेडिंग, पॅकिंग व निर्यात हाताळणी केंद्राच्या प्रमुख सुविधा पुरविण्यात येतील. याचा लाभ प्रामुख्याने विदर्भ व मराठवाड्यातील शेतकऱ्यांना होईल, अशीही माहिती दिली.

६) ग्रामसडक योजनेच्या दुसऱ्या टप्प्याची घोषणा

मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेबाबत माहिती देताना अजित पवार म्हणाले, मुख्यमंत्री ग्रामसडक योजना टप्पा-१ ची कामे पूर्णत्वास आली असून टप्पा-२ अंतर्गत ९ हजार ६१० किलोमीटर लांबीच्या रस्त्यांच्या दर्जोन्नतीची कामे मार्च, २०२६ अखेर पूर्ण करण्याचं नियोजन आहे.

मुख्यमंत्री ग्रामसडक योजना टप्पा-२ अंतर्गत अतिरिक्त ७ हजार किलोमीटर लांबीच्या रस्त्यांचे काँक्रीटीकरण करण्यात येणार आहे.

मुख्यमंत्री ग्रामसडक योजना टप्पा-३ अंतर्गत १ हजारपेक्षा जास्त लोकसंख्या असलेली ३ हजार ५८२ गावे, १४ हजार किलोमीटर लांबीच्या सिमेंट काँक्रीटच्या रस्त्याने प्रमुख जिल्हा मार्गांना, राज्य महामार्ग किंवा राष्ट्रीय महामार्गांना जोडली जातील. या प्रकल्पाची एकूण किंमत ३० हजार १०० कोटी रूपये आहे. पहिल्या टप्प्यात ८ हजार कोटी रूपये रकमेची कामे हाती घेण्यात येणार असल्याचं पवार यांनी सांगितलं.

७) हवामान बदलासंदर्भात घोषणा

हवामान बदल आणि समुद्राच्या पातळीत होत असलेल्या वाढीमुळे निर्माण होणाऱ्या नैसर्गिक आपत्तींपासून बचाव करण्यासाठी महाराष्ट्रातील किनारी जिल्ह्यांमध्ये ८ हजार ४०० कोटी रुपये किंमतीचा बाह्यसहाय्यित प्रकल्प राबविण्यात येणार असल्याचं पवार यांनी सांगितलं.

महाराष्ट्र शाश्वत पर्यावरणपूरक किनारा संरक्षण व व्यवस्थापन या ४५० कोटी रुपये किंमतीच्या प्रकल्पांतर्गत सिंधुदुर्ग जिल्ह्यातील देवबाग येथे १५८ कोटी रुपये किंमतीच्या कामांना मान्यता देण्यात आली आहे.

या प्रकल्पामुळे समुद्रकिनारी वास्तव्यास असलेल्या नागरीकांच्या जीविताचे व मालमत्तेचे रक्षण होईल, असं पवार म्हणाले.

८) 'सर्वांसाठी घरे'चं उद्दिष्ट

'सर्वांसाठी घरे' हे उद्दिष्ट येत्या पाच वर्षात साध्य करण्यासाठी राज्याचे नवीन गृहनिर्माण धोरण लवकरच जाहीर करण्यात येणार आहे, असं अजित पवारांनी सांगितलं.

यावेळी अजित पवार म्हणाले की, राज्यात प्रधानमंत्री आवास योजना, पीएम जनमन या केंद्र पुरस्कृत तर रमाई आवास, शबरी आवास, आदिम आवास, पारधी आवास, अटल बांधकाम कामगार वसाहत, यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर आवास, मोदी आवास तसेच धर्मवीर आनंद दिघे घरकुल या योजना राबविण्यात येत आहेत. त्याअंतर्गत आतापर्यंत एकूण ४४ लाख ७ हजार घरकुल मंजूर करण्यात आली आहेत.

तसंच, ते पुढे म्हणाले की, प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण टप्पा – २ अंतर्गत सन २०२४ –२५ करिता २० लाख घरकुलांच्या उद्दीष्टापैकी सुमारे १८ लाख ३८ हजार घरकुलांना मंजुरी दिली असून १४ लाख ७१ हजार लाभार्थींना पहिल्या हप्त्यासाठी २ हजार २०० कोटी रुपये वितरीत करण्यात आले आहेत. ही योजना राबविण्यात महाराष्ट्र देशात प्रथम क्रमांकावर आहे. लोकप्रतिनिधी आणि लाभार्थींच्या मागणीला प्रतिसाद म्हणून राज्य शासनाकडून या योजनेच्या अनुदानात ५० हजार रुपयांची वाढ करण्यात येणार आहे. या सर्व घरकुलांच्या छतावर सौर उर्जा संच बसविण्यात येणार आहेत.

९) कृषि क्षेत्रात ख सह अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या वापराचे धोरण

कृषि क्षेत्रातील अत्याधुनिक तंत्रज्ञानासाठीचे धोरण मांडताना पवार म्हणाले, कृषि क्षेत्रामध्ये कृत्रिम बुद्धिमत्ता (ख) आणि अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या वापराचे धोरण आखण्यात येत आहे. शेतकऱ्यांना पीक नियोजनाचा सल्ला देणे, उत्पादन खर्च कमी करणे, उत्पादकता वाढविणे, दर्जेदार शेतमालाचे उत्पादन तसेच शेतमालाला हक्काची व शाश्वत बाजारपेठ मिळवून देणे यासाठी शासकीय, निमशासकीय व खाजगी क्षेत्रात उपयुक्त असलेल्या प्रणाली शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी 'कृत्रिम बुद्धिमत्ता' तंत्रज्ञानाचा वापर करण्यात येणार आहे.

याच्या पहिल्या टप्प्यात ५० हजार शेतकऱ्यांच्या एक लाख एकर क्षेत्राला त्याचा फायदा होईल. येत्या दोन वर्षात त्यासाठी ५०० कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करुन देण्यात येणार आहे, असं पवार यांनी सांगितलं.

१०) जलयुक्त शिवार अभियान २.०

जलयुक्त शिवार अभियान २.० अंतर्गत ५ हजार ८१८ गावांमध्ये ४ हजार २२७ कोटी रुपये किंमतीची १ लाख ४८ हजार ८८८ कामे हाती घेण्यात आल्याची माहिती अजित पवारांनी दिली.

अभियानातील सर्व कामे मार्च, २०२६ पर्यंत पूर्ण करण्यात येणार असल्याचंही पवारांनी सांगितलं.

११) नदीजोड प्रकल्पाचे धोरण

वैनगंगा-नळगंगा नदीजोड प्रकल्पास तत्वत: मान्यता देण्यात आली असल्याचं पवार यांनी सांगितलं. या प्रकल्पाची अंदाजित किंमत ८८ हजार ५७४ कोटी रुपये असून प्रकल्पाचे लाभक्षेत्र ३ लाख ७१ हजार २७७ हेक्टर आहे. या प्रकल्पाचा लाभ नागपूर, वर्धा, अमरावती, यवतमाळ, अकोला व बुलढाणा या सहा जिल्हयांना होणार आहे. प्रकल्पाची सविस्तर सर्वेक्षण व अन्वेषणाची कामे सुरू आहेत.

दमणगंगा-एकदरे-गोदावरी या नदीजोड प्रकल्पामुळे ३.५५ टीएमसी पाणी उपलब्ध होणार असून त्यामुळे जायकवाडी धरणाच्या लाभक्षेत्रातील ९ हजार ७६६ हेक्टर क्षेत्र पुनर्स्थापित होईल. नाशिक जिल्ह्यातील २ हजार ९८७ हेक्टर क्षेत्रालाही यामुळे सिंचनाचा लाभ होईल. या प्रकल्पाची अंदाजित किंमत २ हजार ३०० कोटी रूपये आहे, असं पवार म्हणाले.

१२) विमानतळांसाठीचे धोरण

महाराष्ट्रातील आगामी विमानतळांच्या धोरणाबाबत माहिती देताना अजित पवार म्हणाले, शिर्डी विमानतळाच्या १ हजार ३६७ कोटी रुपये किंमतीच्या विकास कामांना मान्यता देण्यात आली असून ती कामे सुरु आहेत. सन २०२१ मध्ये शिर्डी विमानतळाला प्रमुख विमानतळाचा दर्जा प्राप्त झाला आहे. नाईट लँडिगची सुविधाही लवकरच सुरु करण्यात येणार आहे. तसेच, रत्नागिरी विमानतळाची १४७ कोटी रुपये रकमेची कामे प्रगतीपथावर आहेत.

यासह अमरावतीतील बेलोरा विमानतळाचे काम पूर्ण झाले असून तेथून ३१ मार्च, २०२५ पासून प्रवासी सेवा सुरु करण्याचे नियोजन आहे. गडचिरोली येथील नवीन विमानतळाच्या सर्वेक्षण व अन्वेषणाची कामे सुरु आहेत. तर, अकोला विमानतळाच्या विस्तारासाठी आवश्यक निधी उपलब्ध करुन देण्यात येणार असल्याचं पवार यांनी सांगितलं.

१३) अनुसूचित जाती उपयोजनेच्या तरतुदीत ४२ टक्के भरीव वाढ

अजित पवार अर्थसंकल्पातून सांगितलं की, अनुसूचित जाती घटकांच्या सर्वांगीण विकासासाठी राजर्षी शाहू महाराज शिष्यवृत्ती योजना, विद्यार्थी वसतिगृहे, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजना, साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी वस्तीसुधार योजना इत्यादी योजना राबविण्यात येत आहेत.

महात्मा फुले मागासवर्गीय विकास महामंडळ, साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ, संत रोहिदास चर्मोद्योग आणि चर्मकार विकास महामंडळाव्दारेही अनेक योजना राबविण्यात येत आहेत. अनुसूचित जाती उपयोजनेच्या तरतुदीत गेल्या वर्षीच्या तुलनेत यावर्षी ४२ टक्के एवढी भरीव वाढ करण्यात आली आहे.

## मारहाणीत तरुण...

मारहाण करून शेतातच सोडून दिले; तर मारहाण करत कृष्णाला रोडला उभ्या असलेल्या पांढऱ्या रंगाच्या गाडीत (एमएच १६ एटी ६६६९) पाठीमागच्या सीटवर टाकून एकनाथ वाडीच्या दिशेने घेऊन गेले. गाडीत आरडाओरड केल्याने रावसाहेब तांबारे व मंगेश तांबारे यांनी पुन्हा मारहाण केली. त्यानंतर चक्कर येऊन कृष्णा हे बेशुद्ध झाले. तो म्हणून या सर्वांनी त्याला सोडून निघून गेले; परंतु शुद्धीवर आल्यावर कृष्णा यांनी मदतीसाठी फोन करून पोलिसांना बोलावून घेतले.

खोक्यामुळे शिरूर चर्चेत-सध्या आमदार सुरेश धस यांचा कार्यकर्ता कुख्यात आरोपी सतीश ऊर्फ खोक्या भोसले याच्या व्हायरल व्हिडीओने शिरूर तालुका चर्चेत आहे. त्याने बाप-लेकालाही बेदम मारहाण केली होती. ही दोन प्रकरणे ताजी असतानाच आता रविवारी आणखी एक व्हिडीओ समोर आला. यात माय लेकाला बेदम मारहाण केली आहे..

## अनिलदादा जगताप...

नवनिर्वाचित राज्य संपर्कप्रमुख किरण चव्हाण यांच्या असंख्य कार्यकर्त्यांनी आज शिवसेनेत जाहीर प्रवेश केला. शिवसेनेचे मुख्य नेते एकनाथजी शिंदे साहेबांच्या नेतृत्वात शिवसेनेची समृद्ध वाटचाल सुरु आहे. सर्वसामान्य लोकांच्या हिताचे कार्य शिंदे साहेब करत आहेत यामुळेच शिंदे साहेबांची महाराष्ट्रभरात ताकद वाढविण्यासाठी आम्ही सर्व एकत्रित येऊन शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप यांच्या उपस्थितीत शिवसेनेत जाहीर प्रवेश करत असल्याची भावना किरण चव्हाण यांनी आपल्या प्रास्ताविक भाषणात व्यक्त केली तर महिला आघाडी मराठवाडा संपर्क प्रमुख संगीता चव्हाण यांनी शिवसेनेत नव्याने प्रवेश करणाऱ्यांचे स्वागत करून जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप यांच्या नेतृत्वात आपण एकजुटीने काम करू असे मनोगत भाषणात सांगितले. दरम्यान शिवसेना जिल्हाप्रमुख अनिल दादा जगताप यांनी मनोजराव चव्हाण, केशवदास महाराज, दगडू दादा गायकवाड, वसंतराव जाधव, ढोले बप्पा जाधव, गणेश आनेराव, सचिन चव्हाण, राजेभाऊ दुधाळ, अंकुश दुधाळ, विष्णू लंगोटे, महादेव लांडगे, गणेश जगताप, नामदेव अंकुटे, मुकुंद आनेराव, गौरव वानखेडे, हरी आनेराव सर्व कार्यकर्त्यांचा स्वागत सत्कार करून शिवसेनेत प्रवेश करून घेतले. याप्रसंगी बीड जिल्हा शिवसेना युवासेना महिला आघाडी पदाधिकारी लोकप्रतिनिधी उपस्थित होते.

## पिस्टल बाळगणारा...

उपनिरीक्षक श्रीराम खटावकर, पोलीस हवालदार अशोक दुबाले, दीपक खांडेकर, सोमनाथ गायकवाड, बाळू सानप,नारायण कोरडे, विकी सुरवसे यांनी केली आहे. जिल्ह्यात कोणी अवैध शस्त्र वापरत असेल किंवा साठा केला असेल तर याची माहिती पोलिसांनी द्यावी असे त्याचे नाव गोपनीय ठेवण्यात येईल असे आवाहन बीड पोलिस अधीक्षक नवनीत कॉवत यांनी केले आहे.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed (Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

**हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक – दत्तात्रय सखाराम नरनाळे**, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

CMYK

# भगवंताला आपल्या अंतकरनात साठवून सेवा करा

## भागवत कथा प्रवक्त्या साक्षीताई करडकर

बीड । प्रतिनिधी

आपले आयुष्य सुंदर करण्यासाठी भगवंताला अंत करनात साठवा व नित्य स्मरण करा,भगवंताला हृदयात साठवून ठेवा आणि आपले नित्य कर्म करा आपले आयुष्य सुखाचे होतेच असा विश्वास ताईंनी यावेळी दिला.

आज पहिल्या दिवशी व्यासपीठ पूजन, श्रोता वक्ता म्हणजे काय ते विषद केले. भागवत ग्रंथ भक्ती ज्ञान वैराग्य याचा त्रिवेणी संगम आहे.आपण या त्रिवेणी संगमात श्रवण भक्तीने न्हाऊन जा व आपल्या जीवनाचे सार्थक करून घ्या असे विशद केले. श्रीमद् भागवत कथा ही आपल्या जीवनात आनंद , प्रेम



देणारी कथा आहे. एकमेकाशी संवाद साधा हे आजच्या काळात खूप महत्वाचे आहे असे करडकर दीदीने सागितले. या कथेमध्ये आज शुक मुनिचा जन्म तसेच भगवान श्री शंकर पार्वती संवाद कथा भाग झाला . या बरोबरच अमृत कुंभ हि कथा विषद केली आणि अमृतकुंभ या विषयी सविस्तर भाष्य केले.

मीराच्या वेशभूषेतील झाकी विशेष आकर्षण- आजच्या कथेमध्ये श्रीकृष्ण भक्तीमध्ये तल्लीन झालेली मीरा यांची जाकी तयार करण्यात आली होती हातामध्ये विना, चिपळ्या आणि मुखाने फक्त श्रीकृष्ण श्रीकृष्ण गोविंद गोविंद या भजनामध्ये तल्लीन झालेली मीरा सभा मंडपामध्ये एक वेगळेच आकर्षण होती. यावेळी गायक तुकाराम महाराज कराडकर यांनी अनुप जलोटा यांच्या आवाजाम ध्ये ऐसी लागी लगन मीरा हो गई मगन हे भजन गायले यावेळी संपूर्ण सभामंडप अगदी श्रीकृष्ण भक्ती मध्ये तल्लीन झाला होता. शेवटी कथेचे यजमान सौ वृंदावनी महादेव साळुंके यांनी भागवत कथा प्रवक्तृया सौ साक्षीताई यांचा पुष्पहार घालून सत्कार केला.

# के.एस.पी विद्यालय येथे महिला दिन उत्साहात साजरा



बीड । प्रतिनिधी

शहरातील (कर्मयोगिनी सावित्रीबाई फुले विद्यालय) के. एस.पी विद्यालय येथे महिला दिन साजरा करण्यात आला. महिला हक्क चळवळीतील केंद्रबिंदू म्हणून हा दिवस पाळला जातो. ८ मार्च हा दिवस समानता, पुनरुत्पादक हक्क आणि महिलांवरील हिंसा आणि अत्याचार यासारख्या मुद्द्यांवर लक्ष केंद्रित करतो. शाळेतील विद्यार्थ्यांना महिला दिनाविषयी अवगत करण्यात आले. या कार्यक्रमध्ये सौ. अंजलीताई शेळके, संस्थाध्यक्षा यांनी शाळेतील महिला कर्मचाऱ्याचे पुष्प गुच्छ देऊन महिला दिनाच्या शुभेच्छा दिल्या. १९ व्या शतकाच्या अखेरपर्यंत, स्त्रियांना दुय्यम दर्जाची वागणूक दिली जात असे. अनेक रुढी परंपरा स्त्रीयावर लादल्या जात होत्या. चुल आणि मुल व घरामध्ये कष्ट करणे याचे साधन म्हणजे स्त्री, असा समज सर्वसाधारणपणे रूढ होता. म्हणूनच, समाजात समानतेने वावरणे, संपत्तीवरील अधिकार, तसेच शिक्षण किंवा म तदान यासारख्या अधिकारांपासून स्त्रिया वंचित होत्या. नोकरीसाठी स्वेच्छेने अथवा परिस्थितीमुळे घराबाहेर पडलेल्या स्त्रियांना नोकरीच्या ठिकाणी असलेली विषमता खटकू लागली. पुरुषांइतकेच काम करूनही वेतनात समानता नव्हती किंवा समान संधीही उपलब्ध नव्हत्या. आणि मग आपल्या हक्कांबाबत स्त्रिया जागृत होऊ लागल्या. स्त्रियांचे आत्मभान जागृत करण्याचे मोलाचे काम ज्यांनी केले त्यातल्या काही स्त्रियांच्या योगदानाबद्दल आपण सदैव कृतज्ञ असणे आवश्यक आहे. अशा प्रकारे शाळेतील महिला कर्मचाऱ्यांनी आपले मनोगत व्यक्त केले.

या कार्यक्रमास प्रमुख उपस्थिती श्री. ऋषिकेशजी शेळके साहेब जेष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी तथा समग्र शिक्षा विभाग प्रमुख, तसेच शाळेतील सर्व महिला शिक्षिका, प्र.मुख्याध्यापक, विशाल सुपेकर व शाळेतील शिक्षक शिक्षिकेत्तर कर्मचारी उपस्थित कार्यक्रम संपन्न झाला.

# आदित्य कृषी महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांची महाराष्ट्रासह परराज्यातील कृषी संशोधन केंद्र, ऐतिहासिक स्थळांना दिल्या भेटी

## ६ दिवसाच्या सहलींमध्ये ३७५ विद्यार्थ्यांचा सहभाग आदित्य शिक्षण संस्था बीड च्या महाविद्यालयाचा राज्यस्तरीय शैक्षणिक दौरा

बीड । प्रतिनिधी

वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ अंतर्गत व आदित्य शिक्षण संस्था बीड संचलित आदित्य कृषी महाविद्यालय बीड येथील बी. एस्सी. कृषी पदवीच्या विद्यार्थी, विद्यार्थिनींचा राज्यस्तरीय शैक्षणिक सहलीचा अभ्यास दौरा संपन्न झाला. या दरम्यान विद्यार्थ्यांनी राज्यातील राष्ट्रीय पातळीवरील नामांकित कृषी संशोधन केंद्र, संशोधन संस्था याबरोबरच ऐतिहासिक प्रेक्षणीय स्थळांना भेटी दिल्या. विद्यार्थ्यांनी तेथील शैक्षणिक माहिती संकलित केली. या ६ दिवसाच्या सहलींमध्ये ३७५ विद्यार्थी सहभागी झाले होते. सदरील सहलीचे आयोजन संस्थेचे मुख्य प्रवर्तक सुभाषचंद्रजी सारडा, संचालक डॉ.आदित्य सारडा, वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ परभणीच्या कार्यकारी सदस्या तथा आदित्य शिक्षण संस्थेच्या संचालिका डॉ. आदिती सारडा यांच्या मार्गदर्शनाखाली आणि महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. श्याम भुतडा यांच्या नियोजनाखाली पाचव्या अधिष्ठाता



समन्वय समितीच्या मार्गदर्शक तत्त्वानुसार विद्यार्थ्यांची आकलन क्षमता वृद्धिंगत करणे, त्यांच्या नाविन्यपूर्ण कल्पना शक्तीला पुरेशी संधी उपलब्ध करून देणे आणि पदवी शिक्षणाबरोबरच सामाजिक, शैक्षणिक व उद्योजकीय विकास रुजवणे अशा उदात्त हेतुने या शैक्षणिक सहलीचे आयोजन २४ फेब्रुवारी १ मार्च २०२५ दरम्यान करण्यात आले होते. या शैक्षणिक सहलींमध्ये ३७५ विद्यार्थी सहभागी झाले होते. या शैक्षणिक सहलीच्या प्रथम चरणाम ध्ये राज्यातील कृषी संशोधन संस्था, कृषी विज्ञान केंद्र, राष्ट्रीय स्तरावरील नामांकित कृषी व कृषी संलग्नित क्षेत्रामध्ये कार्यरत कंपन्या ना भेट देऊन माहिती घेतली. तसेच ऐतिहासिक महालक्ष्मी मंदिर, पन्हाळा किल्ला, विविध सागरी किनारे, कृषी महाविद्यालये ई. ठिकाणी प्रत्यक्ष भेटी देऊन माहिती संपादित केली. सदरील शैक्षणिक सहलीच्या माध्यमातून सहलीत सहभागी विद्यार्थी, विद्यार्थिनींना कृषि क्षेत्रातील आधुनिक तंत्रज्ञान, उद्यमशीलता, उद्योग व्यवसाय, हंगामानुसार पीक उत्पादन, उपलब्ध बाजारपेठा इत्यादी विविध कृषि क्षेत्रातील तांत्रिक मार्गदर्शन व माहिती प्राप्त करून घेतली.


## जाहीर प्रगटन

**मा. श्री. ए. एम. पाटील ५ वे दिवाणी न्यायाधीश क. स्तर बीड ता. जि.बीड यांचे न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज नंबर ४०६/२०२५**

**शेख अखिल शेख जाफर वि. निरंक**

ज्यापेक्षा **शेख मन्नाबी शेख जाफर,** ह्या दिनांक ०६/०३/२०२४ रोजी नेकनुर ता. जि. बीड येथे मयत झालेले आहेत. आणि तसेच अर्जदार

१ शेख अखिल पि. शेख जाफर, वय - ४८ वर्षे, रा. नेकनूर, ता.जि.बीड

२ सय्यद सगीरा बेगम सय्यद इफ्तेखार, वय - ६१ वर्षे, रा. नेकनूर, ता. जि. बीड

३ जाकिरा सिकंदर शेख, वय - ६५ वर्षे, रा. बालेपीर, ता. जि. बीड

अर्जदार नं. १ हा मयत नामे **शेख मन्नाबी शेख जाफर,** यांचा मुलगा असून अर्जदार क्र. २ व ३ या विवाहीत मुली आहेत. तसेच मयताचे पती नामे शेख जाफर शेख उस्मान हे दि. २३/०२/२०१९ रोजी मयत झाले आहेत. या अर्जदारा व्यतीरिक्त मयतास इतर दुसरे कोणीही वारस नाहीत. असे वरील अर्जदारांचे म्हणणे आहे. वरील अर्जदार यांनी ते मयताचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र त्यांच्या हक्कात मिळण्यासाठी या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे. त्यापेक्षा सदरहू अर्जदार मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्याचे तारखेपासुन एक महिन्याचे आत, एक महिन्याचे आत, त्यांनी हया कोर्टात हजर होऊन आपल्या हरकती कळवाव्यात, या लेखावरून असे कळविण्यात येते की, जरआणि सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट, सदरहू अर्जदारांच्या हक्काबददल लागलीच पुरावा घेऊन, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास, त्यांना / अर्जदारांना सदरहू शेख मन्नाबी शेख जाफर, यांचे वारस असल्या बाबतचे प्रमाणपत्र देईल याची नोंद घ्यावी.

**प्रकरणाची पुढील तारीख २८/०४/२०२५ आहे.**

आज दिनांक ०७ मार्च २०२५ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्कानिशी दिले.

**(अॅड. शिंदे एस.बी यांच्या मार्फत)**

**आदेशावरून.**
**(स्वाक्षरीत)**
**अधीक्षक**
**दिवाणी न्यायालय,क.स्तर, बीड**

**(स्वाक्षरीत)** शिक्का
**क.लिपीक**

## जाहीर प्रगटन

**मा. श्री. संजय टी. सहारे, २ रे सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर, बीड यांच्या न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक: ३७२/२०२५**

अर्जदार : १. जयजयराम दादाराव आमटे, वय ४७ वर्षे, धंदा शेती, रा. जैताळवाडी, ता. जि. बीड, २. सुनिल दादाराव आमटे, वय - ४५ वर्षे, धंदा शेती, रा. वरीलप्रमाणे, ३. गवळण नाथाजी जाधव, वय ५२ वर्षे, धंदा घरकाम, रा. वरीलप्रमाणे,

विरुध्द निरंक

**प्रकरण - बॉम्बे रेग्युलेशन कायदा १८२७ चे कलम २ अन्वये वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.**

ज्याअर्थी नामे दांदाराव देवराव आमटे हे / या दि. २६/०४/२०२२ रोजी जैताळवाडी, ता. जि. बीड येथे मयत असुन अर्जदार क १ व २ हे मयताचे मुले आहेत. तर अर्जदार क ३ ही मयताची विवाहीत मुलगी आहे.

अर्जदार शिवाय मयताचे ईतर कोणीही वारस नाहीत असे अर्जदाराचे म्हणणे आहे.

अर्जदार असेही म्हणणे आहे की, शासकिय व निमशासकीय कार्यालयीन उपयोगा करीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे म्हणून सदरचा अर्ज या न्यायालयात दाखल केला आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यांत येते की, सदरील अर्जदार हे मयताचे वारस नाहीत असे कोणास समजावयाचे असेल तर त्यांनी हे जाहिर प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसाच्या आंत या न्यायालयात हजर होऊन आपली हरकत द्यावी. जर मुदतीत कोणीही हरकत न दिल्यास हे न्यायालय अर्जदाराचे हक्कांत त्यांचा हक्का बाबतचा पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना मयताचे वारस असल्याबद्यलचे वारस प्रमाणपत्र दिले जाईल याची सर्वांनी नोंद घ्यावी.

आज दिनांक:- ०६/०३/२०२५ रोजी न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

पुढील तारीख :- १७/०४/२०२५.

(मार्फत विधिज्ञ :- श्री एस बी शिंदे)

**आदेशावरून.**
**(स्वाक्षरीत)**
**अधीक्षक**
**दिवाणी न्यायालय,क.स्तर, बीड**

**(स्वाक्षरीत)** शिक्का
**क.लिपीक**

## जाहीर प्रगटन

**मा. श्री. संजय टी. सहारे, २ रे सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर, बीड यांच्या न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक : ४१८/२०२५**

अर्जदार : १. बाबासाहेब रामराव शिंदे, वय ४४ वर्षे, धंदा शेती. रा. नेकनूर, ता.जि.बीड, २. स्वामी रामराव शिंदे, वय ३४ वर्षे, धंदा शेती, रा. वरीलप्रमाणे, ३. नंदाबाई मोहन दाबेकर, वय ६२ वर्षे, धंदा घरकाम, रा. वरीलप्रमाणे, ४. कुसुम अंकुश काळे, वय- ५० वर्षे, धंदा घरकाम, रा. वरीलप्रमाणे, ५. सुनिता बबन बरडे, वय -५५ वर्षे, धंदा घरकाम, रा. वरीलप्रमाणे.६. राधा बाळासाहेब पवार, वय - ४३ वर्षे, धंदा घरकाम, रा. वडगांव कळसंबर, ता.जि.बीड, ७. अनिता लक्ष्मण कदम, वय - ३७ वर्षे, धंदा घरकाम, रा. येळंबघाट, ता. जि. बीड, ८. सविता उध्दव जगताप, वय - ३५ वर्षे, धंदा घरकाम, रा. बंदेवाडी, ता. केज, जि.बीड,

विरुध्द- निरंक

**प्रकरण - बॉम्बे रेग्युलेशन कायदा १८२७ चे कलम २ अन्वये वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.**

ज्याअर्थी नामे रामराव तात्याबा शिंदे हे / या दि. २८ /११ / २०२४ रोजी व तारामती रामराव शिंदे या दि. २९/०१/२०२४ रोजी नेकनूर, ता. जि. बीड येथे मयत असुन अर्जदार क १ व २ हे मयमावे मुले आहेत. तर अर्जदार क ३ ते ८ या मयताच्या विवाहीत मुली आहेत.

अर्जदार शिवाय मयताचे ईतर कोणीही वारस नाहीत असे अर्जदाराचे म्हणणे आहे.

अर्जदार असेही म्हणणे आहे की, शासकिय व निमशासकीय कार्यालयीन उपयोगा करीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे म्हणून सदरचा अर्ज या न्यायालयात दाखल केला आहे.

त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यांत येते की, सदरील अर्जदार हे मयताचे वारस नाहीत असे कोणार समजावयाचे असेल तर त्यांनी हे जाहिर प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसाच्या आंत या न्यायालयात हज होऊन आपली हरकत द्यावी. जर मुदतीत कोणीही हरकत न दिल्यास हे न्यायालय अर्जदाराचे हक्कांत त्यांच हक्काबाबतचा पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना मयताचे वारस असल्याबद्यलचे वार प्रमाणपत्र दिले जाईल याची सर्वांनी नोंद घ्यावी.

आज दिनांक :- ०६/०३/२०२५ रोजी न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

**पुढील तारीख :- १७/०४/२०२५.**

**( मार्फत विधिज्ञ :- श्री एस. बी. शिंदे)**

**आदेशावरून.**
**(स्वाक्षरीत)**
**अधीक्षक**
**दिवाणी न्यायालय,क.स्तर, बीड**

**(स्वाक्षरीत)** शिक्का
**क.लिपीक**

## जाहीर प्रगटन

**वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा श्री. आर. आर. जाधव ४ थे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, गेवराई गेवराई, जि. बीड यांचे न्यायालयात**

**दिवाणी किरकोळ अर्ज क. २१२/२०२५ सुशलाबाई वि. निरंक**

ज्याअर्थी **मयत नामे कल्याण पि.शंकरराव औटी, मौजे रा. उमापुर, ता. गेवराई, जि. बीड दिनांक १३ / ०१ / २०२१ मौजे उमापुर, ता. गेवराई, जि. बीड** येथे मयत झाले.

अर्जदार :- १) सुशलाबाई भ्र कल्याण औटी, वय ५९, धंदा घरकाम, रा. उमापुर, ता. गेवराइ, जि. बीड.

ज्याअर्थी अर्जदार यांना शासकिय व निमशासकिय कामासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे करीता मुंबई रेग्युलेशन अॅक्टचे कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हेत असे कोणाचे म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासुन तीस दिवसांचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुण असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेवुन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर **मयत नामे कल्याण पि.शंकरराव औटी, मौजे रा. उमापुर, ता. गेवराई, जि. बीड** यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनाक ०५/०३/२०२५ माझ्या सही व शिक्यानिशी दिले.

**पुढील तारीख १६/०४/२०२५**

**(मार्फत -अॅड. एस. बी. आरबड, गेवराई)**

**आदेशावरून.**
**(स्वाक्षरीत)**
**सहायक अधीक्षक**
**दिवाणी न्यायालय,क.स्तर, गेवराई**

**(स्वाक्षरीत)** शिक्का
**क.लिपीक**

## जाहीर प्रगटन

**मा.श्री आर. जी. बागडे साहेब, ५ वे सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, बीड यांचे न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज ३९९/२०२५**

अर्जदार - १. फरीदा भ्र. इस्माइल कुरेशी, वय - ७६ वर्षे, धंदा - घरकाम, रा. पिंपळनेर, ता. जि. बीड. २. जरीना भ्र. गौस कुरेशी, वय - ३३ वर्षे, धंदा- घरकाम, रा. सदर. ३. अल्तमाश पि. गौस कुरेशी, वय - १६ वर्षे, धंदा - शिक्षण, फरीदा विरूध्द निरंक, अज्ञान अ.पा.क. आई अर्जदार क्र. २, रा. सदर. ४. दिशान पि. गौस कुरेशी, वय - १४ वर्षे, धंदा - शिक्षण, अज्ञान अ.पा. क. आई अर्जदार क. २, रा. सदर. ५. हुमेरा पि. गौस कुरेशी, वय - १२ वर्षे, धंदा - शिक्षण, अज्ञान अ.पा.क. आई अर्जदार क्र.२, रा. सदर.

**मागणी - बॉम्बे रेग्युलेशन अॅक्ट. १८२७ कलम २ नुसार वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.**

वरील अर्जदार यांनी या न्यायालयात मयत **गौस पि. इस्माईल कुरेशी** मृत्यु झाला, यांचे वारस असल्याबाबत वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज दाखल केला आहे.

ज्याअर्थी मयत **गौस पि. इस्माईल कुरेशी** यांचा मृत्यु दिनांक ३१/१०/२०२२ रोजी झाला आहे. वरील अर्जदारा व्यतिरिक्त मयतास इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत.

मयत गौस पि. इस्माईल कुरेशी यांच्या मृत्युनंतर वरील अर्जदारांना शासकीय व निम शासकीय कामासाठी सदर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहू अर्जदार सदरहू मयताचे वारस नव्हेत असे कोणास सम जाविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्यांचे तारखेपासून एक महिन्याचे आत त्यांनी या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार हयांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहू **मयत गौस पि. इस्माईल कुरेशी** यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक १०/०३/२०२५ रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्याने दिले.

**सदर प्रकरणाची पुढील तारीख दि. १६/०४/२०२५ आहे.**

**आदेशावरून.**
**(स्वाक्षरीत)**
**अधीक्षक**
**दिवाणी न्यायालय,क.स्तर, बीड**

**(स्वाक्षरीत)** शिक्का
**क.लिपीक**

## जाहीर प्रगटन

**मा. विशाखा बी. पाटील ६वे सह. दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, बीड यांचे न्यायालयात**

**दिवाणी किरकोळ अर्ज नंबर ३७०/२०२५**

**तारामती राजाराम निर्मळ विरूध्द सुमनबाई राजाराम निर्मळ**

अर्जदार - १. तारामती भ्र. राजाराम निर्मळ, वय: ७२ वर्षे, धंदा - घरकाम, रा. बजरंग नगर कॅनॉल रोड बीड. ता. जि. बीड., २.बंडू पि. राजाराम निर्मळ, वय: ४५ वर्षे, धंदा -शेती, रा. बजरंग नगर कॅनॉल रोड बीड. ता. जि. बीड, ३.सतिष पि. राजाराम निर्मळ, वय: ४२ वर्षे, धंदा -शेती, रा. बजरंग नगर कॅनॉल रोड बीड. ता. जि. बीड, ४. दिनेश पि. राजाराम निर्मळ, वयः ४० वर्षे, धंदा -शेती, रा. बजरंग नगर कॅनॉल रोड बीड. ता. जि. बीड विरुध्द

गैरअर्जदार - १.सुमनबाई भ्र. राजाराम निर्मळ, वय: ६५ वर्षे, धंदा- घरकाम, रा. वसाहती कॅम्प समोर, गोवर्धन रोड सिरसाळा, ता. परळी जि. बीड, २. रेखा पि. राजाराम निर्मळ, वय ३५ वर्षे, धंदा- घरकाम, रा. वसाहती कॅम्प समोर, गोवर्धन रोड सिरसाळा, ता. परळी जि. बीड.

**मागणी : वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.**

वरील अर्जदार यांनी या न्यायालयात मयत **राजाराम सखाराम निर्मळ,** यांचे वारस असल्या बाबतचे प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे.

ज्याअर्थी **राजाराम सखाराम निर्मळ, मृत्यु दि. २९/०८/२०२१, रोजी रा. बजरंग नगर कॅनॉल रोड, बीड. ता. जि. बीड.** येथे मयत झालेले असून अर्जदार क. १ ही अर्जदार क्र. २ ते ४ यांची आई असून मयत राजाराम सखाराम निर्मळ, अर्जदार क्र. १ चा पती असून २ ते ४ चे वडील होते. गैरअर्जदार क. १ ही मयताची दुसरी पत्नी असुन गैहअर्जदार क्र. २ हि तिची मुलगी आहे. वरील अर्जदार यांना शासकीय व खाजगी कामासाठी वारस प्रमाणपत्र याची आवश्यकता आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहू अर्जदार सदरहू मयताचे वारस नाही असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्याचे तारखेपासुन एक महिन्याचे आत, त्यांनी हया कोर्टात हजर होऊन आपल्या हरकती कळवाव्यात, आणि हया लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार हयांचे हक्काबददूल लागलीच पुरावा घेऊन, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास, त्यांना सदरहू मयत राजाराम सखाराम निर्मळ, रा. बजरंग नगर कॅनॉल रोड बीड. ता. जि. बीड. यांचे वारस असल्या बाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी. आज दिनांक ०१ माहे ०३ सन २०२५ रोजी माझ्या सहिने व न्यायालयाचे शिक्याने दिले. सदर प्रकरणाची **पुढील तारीख दि. १०/०४/२०२५ आहे.**

**आदेशावरून.**
**(स्वाक्षरीत)**
**अधीक्षक**
**दिवाणी न्यायालय,क.स्तर, बीड**

**(स्वाक्षरीत)** शिक्का
**क.लिपीक**

## जाहीर प्रगटन

**मा. श्रीमती डी.के. पाटील साहेब ०६ वे सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, बीड यांच्या न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज ३७६/२०२५, धरमसिंग विरुध्द निरंक**

अर्जदार :- १) धरमसिंग पि. नारायणसिंग ठाकूर, वय ६४ वर्षे धंदा शेती, रा. कटकटपुरा, जुनी भाजीमंडई, अशोक टॉकीज जवळ, बीड ता. जि. बीड २) सुरज पि.धरमसिंग ठाकूर वय ३५ वर्षे धंदा व्यवसाय रा. सदर

विरुध्द निरंक

मागणी अर्ज: बॉम्बे रेग्युलेशन अॅक्ट १८२७ चे कलम २ नुसार वारस प्रमाणपत्र (Heirship Certificate) मिळणे बाबत.

वरील अर्जदार यांनी या न्यायालयात मयत नामे **शोभाबाई . धरमसिंग ठाकूर** यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळवण्यासाठी अर्ज केला आहे.

ज्याअर्थी मयत नामे **शोभाबाई भ्र. धरमसिंग ठाकूर** रा. कटकटपुरा, जुनी भाजीमंडई, अशोक टॉकीज जवळ, बीड ता जि.बीड यांचा मृत्यु दिनांक : १९.११.२०२४ रोजी सूर्या मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल क्रिटीकल केअर यूनिट, बीड ता.जि.बीड येथे झाला. अर्जदार क १ हे मयताचे पती आहेत. अर्जदार क २ हा मयताचा मुलगा आहे. मयतास सदर अर्जदारांशिवाय ईतर कुणीही वारस नाही.

वरील अर्जदारांना मयताचे मृत्युनंतर शासकीय व निमशासकीय कामाकरीता सदर वारस प्रम ाणपत्राची आवश्यकता आहे असे अर्जदार यांनी अर्जात नमुद केलेले आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहु अर्जदार व गैरअर्जदार सदरहु मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहिरनाम्यांचे तारखेपासुन एक महिन्याचे आत त्यांनी या कोर्टात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहु कोर्ट सदरहु अर्जदार हयांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवुन, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहु मयत **शोभाबाई भ्र. धरमसिंग ठाकूर** यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक ०७/०३/२०२५ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले. सदर प्रकरणाची पुढील तारीख दिनांक २२/०४/२०२५.

**(अॅड. खाडे एस.डी. यांच्या मार्फत)**

**आदेशावरून.**
**(स्वाक्षरीत)**
**अधीक्षक**
**दिवाणी न्यायालय,क.स्तर, बीड**

**(स्वाक्षरीत)** शिक्का
**क.लिपीक**

## जाहीर प्रगटन

**मा. श्रीमती पी डी चव्हाण ४ थे सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, बीड यांच्या न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज ४०५/२०२५, गणपती पि. देविदास म्हेत्रे व इतर विरुध्द निरंक**

अर्जदार :- १. गणपती पि. देविदास म्हेत्रे, वय - ५४ वर्षे, धंदा - शेती, रा. नाळवंडी, ता. जि. बीड, २. अभिमान पि. देविदास म्हेत्रे, वय - ५२, वर्षे, धंदा - शेती, रा. नाळवंडी, ता. जि. बीड, ३. बंडु पि. देविदास म्हेत्रे, वय - ४२, वर्षे, धंदा-शेती, रा. नाळवंडी, ता. जि. बीड, ४. कांताबाई भ्र. आसाराम म्हेत्रे, वय - ६४ वर्षे, धंदा - घरकाम, रा. नाळवंडी, ता. जि. बीड, ५. भागवत पि. आसाराम म्हेत्रे, वय - ३३, वर्षे, धंदा - शेती, रा. नाळवंडी, ता. जि. बीड, ६. शांताबाई भ्र. केरबा ढगे, वय - ६१, वर्षे, धंदा - घरकाम, रा. सुलतानपुर ता. माजलगाव, जि. बीड, ७. संगिता भ्र. महादेव शिंदे वय - ५३, वर्षे, धंदा - घरकाम, रा. पिंपरखेड ता. वडवणी, जि. बीड, ८. संजीवणी भ्र. महादेव जंगले, वय - ४८, वर्षे, धंदा - घरकाम, रा. त्रिमुर्ती कॉलनी, पात्रुड, ता. माजलगाव, जि. बीड ९. सुनिता भ्र. गोरखनाथ काळे, वय - ४५, वर्षे, धंदा - घरकाम, रा.स्वप्नपुर्ती हाउसिंग सोसा. स्पाइन रोड, चिखली, पुणे ४११ ०६२ (अर्जदार हे भारतीय आहेत )

विरुध्द निरंक

**मागणी अर्ज:- बॉम्बे रेग्युलेशन अॅक्ट १८२७ चे कलम २ नुसार वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत**

वरील अर्जदार यांनी या न्यायालयात मयत **देविदास गणपती म्हेत्रे** यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळवण्यासाठी अर्ज केला आहे.

ज्याअर्थी मयत **देविदास गणपती म्हेत्रे** यांचा मृत्यु दिनांक २५.०६.२०१८ मौजे नाळवंडी ता. जि. बीड येथे झाला असुन अर्जदार क १ ते ३ हे मयताचे मुले असून अर्जदार क ४ ही मयताची सुन म्हणजे मयत मुलगा आसाराम देविदास म्हेत्रे याची पत्नी आहे तर अर्जदार क ५ हा मयताचा नातु म्हणजे अर्जदार क ४ चा मुलगा आहे. अर्जदार क ६ ते ९ या मयताच्या विवाहीत मुली आहेत. हे मयताचे कायदेशीर वारस आहे.

वरील अर्जदारास शासकीय व निमशासकीय कामाकरीता व इतर कार्यालयीन उपयोगाकरीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहु अर्जदार सदरहु मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहिरनाम्यांचे तारखेपासुन एक महिन्याचे आत त्यांनी या कोर्टात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहु कोर्ट सदरहु अर्जदार हयांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा पुरावा घेवुन, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहु मयत मयत देविदास गणपती म्हेत्रे यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी. आज दिनांक ०६ मार्च २०२५ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

सदर प्रकरणाची पुढील तारीख दि. १५ एप्रिल २०२५

**(अॅड. एम डी धांडे यांच्या मार्फत)**

**आदेशावरून.**
**(स्वाक्षरीत)**
**अधीक्षक**
**दिवाणी न्यायालय,क.स्तर, बीड**

**(स्वाक्षरीत)** शिक्का
**क.लिपीक**

## जाहीर प्रगटन

**मा. श्री. ए. एम. पाटील ५ वे दिवाणी न्यायाधीश क. स्तर बीड ता. जि. बीड यांचे न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज नंबर ४२२/२०२५, सागर अनिल जोजारे वि. निरंक**

ज्यापेक्षा अनिल गणपतराव जोजारे, हे दिनांक १९/१२/२४ रोजी लोटस मल्टीस्पेशालिटी हॉस्पीटल, बीड, ता.जि.बीड येथे मयत झालेले आहेत. आणि तसेच अर्जदार-

१. सागर पि. अनिल जोजारे, वय-३९ वर्षे, रा. एन. के. कॉलनी, कैलास नगर, बीड, ता.जि. बीड, २. मयुरी भ्र. सचिन शहाणे, वय-३७ वर्षे, रा. मेघराज नगर, शाहू चौक, लातूर, ता. जि. लातूर ३. कोमल भ्र. नरेंद्र दहिवाळ वय-३६ वर्षे, रा. कॉलेज रस्ता, पेन्शनपुरा, जालना, ता. जि. जालना. ४.पूजा भ्र. निलेश निफाडकर, वय-३४ वर्षे, रा. रामबाग कॉलनी, नवी पेठ, पुणे शहर, ए. पी. कॉलेज, ता. जि. पुणे

अर्जदार नं. १ हा मयत नामे अनिल गणपतराव जोजारे, यांचा मुलगा असून अर्जदार क्र. २ ते ४ या विवाहीत मुली आहेत. तसेच मयताचे पत्नी नामे जयश्री भ्र. अनिल जोजारे ही दि. १४/०३/२०२२ रोजी मयत झालेली आहेत. या अर्जदारा व्यतीरिक्त मयतास इतर दुसरे कोणीही वारस नाहीत. असे वरील अर्जदारांचे म्हणणे आहे. वरील अर्जदार यांनी ते मयताचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र त्यांच्या हक्कात मिळण्यासाठी या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे.

त्यापेक्षा सदरहू अर्जदार मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्याचे तारखेपासुन एक महिन्याचे आत, त्यांनी हया कोर्टात हजर होऊन आपल्या हरकती कळवाव्यात, आणि या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट, सदरहू अर्जदारांच्या हक्काबददल लागलीच पुरावा घेऊन, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास, त्यांना / अर्जदारांना सदरहू मयतअनिल गणपतराव जोजारे, यांचे वारस असल्या बाबतचे प्रमाणपत्र देईल याची नोंद घ्यावी.

**प्रकरणाची पुढील तारीख २८/०४/२०२५ आहे.**

आज दिनांक ०७ मार्च २०२५ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्कानिशी दिले.

**(अॅड. दहिवाळ.आर.जे. यांच्या मार्फत)**

**आदेशावरून.**
**(स्वाक्षरीत)**
**अधीक्षक**
**दिवाणी न्यायालय,क.स्तर, बीड**

**(स्वाक्षरीत)** शिक्का
**क.लिपीक**

# ढाकणे पिता-पुत्राला होणार अटक ?
# ॲट्रॉसिटी आणि पोक्सोअंतर्गत गुन्हा दाखल

**बीड । प्रतिनिधी**

बीडमधील शिरूरमध्ये ढाकणे पिता पुत्रावर झालेल्या मारहाणप्रकरणी मोठी माहिती समोर येत आहे. ढाकणे पिता पुत्रासह इतर दोघांविरोधात ॲट्रॉसिटी आणि पोक्सो अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आलाय. शालन भोसले यांनी दाखल केलेल्या तक्रारीनुसार, ढाकणे पिता पुत्राने तक्रारदार महिलेच्या मुलांवर हल्ला केलाय. या प्रकरणी महिलेनं पोलीस ठाण्यात धाव घेत तक्रार दाखल केली.




गेल्या काही दिवसांपासून ढाकणे पिता पुत्रावर झालेल्या हल्लूयामुळे बीड हादरलं होतं. हरणाची शिकार करताना आडवलं म्हणून ढाकणे पिता पुत्राला मारहाण करण्यात आली होती. या प्रकरणात ढाकणे पिता-पुत्राने सतीश भोसले उर्फ खोक्याच्या विरोधात पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली होती. तसेच त्याला अटक झाली पाहिजे, अशी मागणी ढाकणे कुटुंब आणि गावकऱ्यांनी केली होती. मात्र, आता ढाकणे पिता-पुत्रासह इतर दोघांविरोधात ॲट्रॉसिटीसह पोक्सो अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. 'आमच्यावर गुन्हा दाखल होऊ शकतो', अशी भीती पिता पुत्राने यापूर्वी व्यक्त केली होती. त्यामुळे सतीश भोसलेला अटक न करता, ढाकणे पिता पुत्रावर गुन्हा दाखल झाल्यामुळे अनेकांनी संताप व्यक्त केलाय. शालन भोसले (वय वर्ष ४०) असे तक्रारदार महिलेचं नाव आहे. महिलेनं शिरूर पोलीस ठाण्यात दिलीप ढाकणे, महेश ढाकणे, संदिप ढाकणे आणि राम ढाकणे यांच्यावर गुन्हा दाखल केला आहे.

महिलेनं तक्रारीत नेमकं काय म्हटलंय ?

महिलेनं दाखल केलेल्या तक्रारीत म्हटलं की, ढाकणे कुटुंबातील सदस्यांनी महिलेच्या मुलांना शेतात डुक्कर पकडण्याचा फास लावण्यासाठी बोलावून घेतले होते. दुसऱ्या दिवशी डुक्कर फासामध्ये अडकले आहे का ? हे पाहण्यासाठी महिलेची दोन्ही मुलं शेतात गेले होते. त्यानंतर महिलेच्या मुलीला आणि मुलाला शिवीगाळ केली. नंतर मुलीला शेतात पाडून तिचा विनयभंग केला. विनयभंग करून तिच्या ओटीपोटात लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. तसेच मुलाच्या डोक्यावर तलवारीनं वार करून जीवे मारण्याचा प्रयत्न केला.

# कैलास बोराडे यांना डागण्या देणाऱ्या गुन्हेगारांना मकोका लावण्याची मागणी

### मारहाण प्रकरणी वडवणी तहसीलदारांना निवेदन

**वडवणी । प्रतिनिधी**

भोकरदन तालुक्यातील कैलास बोराडे या युवकास महाशिवरात्रीला देवदर्शन ला गेल्याने लोखंडे रोडने मारहाण करणाऱ्या गाव गुंडावर मकोका घालवण्याचे मागणी मुख्यमंत्री यांच्याकडे सकल धनगर जमात वडवणी तालुका यांच्या वतीने



वडवणी तहसील कार्यालय येथे निवदेन देण्यात आले आहे

भोकरदन तालुक्यातील अनुवा गावातील कैलास बोराडे या तरुणाला महाशिवरात्री दिवशी दर्शनाला गेला म्हणून गावातील गुंड गुन्हेगारी प्रवर्तीच्या लोकांनी व त्यांच्या सहकाऱ्यांनी लोखंडी रॉड (सळई) आगीत लालबुंद गरम करून त्यांच्या सर्व अंगाला गुरुद्वारा चटके दिले व अतिशय जीवघेणं ▶▶ उर्वरित पान २ वर



*अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेच्या वतीने क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले यांच्या स्मृती दिना निमित्त विनम्र अभिवादन करताना समता परिषदेचे प्रदेश सरचिटणीस तथा सिनेट सदस्य ॲड. सुभाष भाऊ राऊत, राष्ट्रवादी काँग्रेस विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षिरसागर, डॉ. सारिका ताई क्षिरसागर, जिल्हाउपाध्य नितीन साखरे,नगरसेवक शुभम धुत, शहराध्यक्ष निखिल शिंदे, प्रा.लक्ष्मन गुंजाळ, नामदेव दुधाळ, मोहनराव गोरे, पाणखाडे, नितीन राऊत, धनंजय काळे, मंगेश जमदाडे, गोरख यादव, शंकर डरांगे, अजिंक्य सुरवसे, राकेश जहांगीड, संतोष यादव, आदींसह समता सैनिक उपस्थित होते.*

# वैष्णवी महाविद्यालयाच्या रासेयो विशेष शिबिराचे उद्‌घाटन

**वडवणी । प्रतिनिधी**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ छत्रपती संभाजी नगर सलग्न व साहेबराव मस्के पाटील शिक्षण प्रसारक मंडळ संचालित वैष्णवी महाविद्यालयाचे रासेयो चे विशेष शिबीर वडवणी तालुक्यातील मौजे हिवरगव्हाण या ठिकाणी घेण्यात येत आहे . या उद्घाटन कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.श्याम सुंदर गुळभिले होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून गावच्या सरपंच सौ.पुष्पाताई संपत काजळे होत्या. कार्यक्रमाच्या प्रास्ताविकामध्ये राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी प्रा. मुंजाजी सोंळके यांनी सात दिवस होणाऱ्या विविध उपक्रम व कार्यक्रमाची माहिती दिली. त्यामध्ये वृक्षा रोपण, आरोग्य निदान शिबीर, जनावरांचे आरोग्य निदान शिबीर अशा महत्वाच्या उपक्रमांची माहिती दिली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. कृष्णा केळे तर अभार प्रा. परमेश्वर शेंडगे यांनी मानले. यावेळी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी, विद्यार्थी, गावकरी , कर्मचारी मोठ मोठ्या संख्येनं उपस्थित होते.



# भारतीय बौद्ध महासभा माजलगाव चे तहसिलदार मार्फत नितीश कुमार यांना निवदन

**माजलगाव । प्रतिनिधी**

बीहार राज्यातील बौद्धांचे पवित्र स्थळ बुद्धगया महाबोधी विहार हे ईत्तर धर्मीयांच्या ताब्यात आसुन बुद्धगया महाबोधी विहार मुक्ती आंदोलन अनेक वर्षापासुन चालु आसुन या अंदोलनाचा एक भाग म्हणुन बुद्धगया मंदिर अधिनियम १९४९ आणी प्रशासनाचे संदर्भा नुसार अनुच्छेद १३,२५ व २६ नुसार न्याय देण्यात यावा या आशयाचे भारतीय बौद्ध महासभा राष्ट्रीय कार्याध्यक्ष आद डॉ भिमराव यशवंतराव आंबेडकर यांच्या आदेशाने व भारतीय बौद्ध महासभा जिल्हा शाखा बीड पुर्व यांच्या सुचने नुसार आज दिनांक १० मार्च २०२५,वार सोमवार रोजी बिहारचे मुख्यमंत्री मा.नितिश कुमार जी यांना तहसिलदार माजलगाव द्वारे बुद्ध गया महाबोधी विहार बौद्धांच्या ताब्यात देण्यात यावे आसे निवेदन भारतीय बौद्ध महासभा तालुका शाखा माजलगाव च्या वतीन देण्यात आले त्या प्रसंगी भारतीय बौद्ध महासभा माजलगाव तालुका अध्यक्ष डॉ भागवत साळवे, महिला जिल्हा अध्यक्षा आद.कमलताई डोंगरे, जिल्हा संस्कार सचिव शामभाऊ वाघमारे,जिल्हा पर्यटन सचिव एन बी राजभोज,जिल्हा संघटक बी सी डोंगरे,बुद्धगया महाविहार मुक्ती अंदोलन कृतिसमिती माजलगावचे अध्यक्ष आद.विजयदादा साळवे, वंचित चे नेते धम्मानंदभाऊ साळवे, भारत तांगडे,सचिन उजगरे, अंकुश आण्णा जाधव, शत्रुघ्न कसबे, शरद उजगरे, बहुजन समाज पार्टी चे जिल्हा प्रभारी, ॲड.अमोल डोंगरे, सदधम्म सेवासंघाचे अध्यक्ष सदाशिव भालेराव सर, पांडुरंग जाधव, राजकुमार सोनवने, तालुका सरचिटणीस सिद्धार्थ वक्ते, वंचित बहु, भारतीय बौद्ध महासभा शहर अध्यक्ष एल आर मस्के,संस्कार उपाध्यक्ष गुलाब धाईजे संरक्षण उपाध्यक्ष नितीन डोंगरे, पर्यटन उपाध्यक्ष चक्रधर पोटभरे, दयानंद साळवे, डी पी वाघमारे नाना, डी पी पोटभरे, पत्रकार किसन भदर्गे ,पत्रकार सुभाष बोराडे, मोहन काकडे, सिद्धार्थ घडस, ॲड.बाबुलाल घनघाव,भगवान डोंगरे , गणपत भालेराव, शोभाताई भोजने, लिलाताई उजगरे, वंदनाताई घनघाव ,मंदाताई साळवे, शारदाताई तांगडे, अनुराधाताई साळवे, मायाताई स्वामी, विशाखाताई वाघमारे, निलावती गायसमुद्रे ,केशरताई तरकसे, गिरजाबाई पोहरे कोमल डोंगरे, सह भारतीय बौद्ध महासभा माजलगाव चे पदाधिकारी उपस्थित होते



### जि.प.चिंचोली माळी या शाळेचे वार्षिक स्नेह संमेलन उत्साहात

**बीड । प्रतिनिधी**

बीड तालुक्यातील चिंचोली माळी येथील जिल्हा परिषद शाळेत हालचालीच्या काळात वार्षिक स्नेहसंमेलनाचे आयोजन दि.९/३/२५ रोजी करण्यात आले. हा कार्यक्रम विद्यार्थ्यांसाठी एक आनंददायी आणि स्मरणीय अनुभव ठरला. या स्नेहसंमेलनात विद्यार्थ्यांनी विविध सांस्कृतिक कार्यक्रमांमध्ये भाग घेतला होता, त्यामुळे त्यांच्या कलात्मक कौशल्याला वाव मिळण्यास मदत झाली. यावेळी या कार्यक्रमाला गावकऱ्यांचा उदंड प्रतिसाद पाहायला मिळाला तसेच यावेळी शाळेतील सर्व शिक्षक वृंद उपस्थित होता. वार्षिक स्नेह संमेलन हा शाळेच्या विद्यार्थ्यांसाठी एक महत्त्वाचा भाग आहे. हा कार्यक्रम त्यांना एकत्र आणतो .

### महाबोधी बुद्धविहार मुक्तीसाठी आज माजलगाव तहसिल कार्यालयावर एकदिवसीय धरणे आंदोलन

**माजलगाव । प्रतिनिधी**

बुद्धगया महाबोधी महाविहार बौद्धांच्या ताब्यात देण्यासाठी देशभरात बौद्ध समाजाकडून आवाज उठवला जात आहे. याच पार्श्वभूमीवर माजलगाव येथे बुद्धगया महाबोधी महाविहार मुक्ती आंदोलन कृती समितीच्या वतीने एक दिवसीय लाक्षणिक धरणे आंदोलन आयोजित करण्यात आले आहे. आज मंगळवार रोजी सकाळी ११ ते सायं. ५ वाजेपर्यंत तहसील कार्यालय माजलगाव येथे आंदोलन करण्यात येणार असुन या आंदोलनात बौद्ध भिक्खू संघ, भिक्खुणी संघ आणि राज्यभरातील बौद्ध अनुयायी सहभागी होणार आहेत. बुद्धगया मुक्ती आंदोलन अधिक सशक्त करण्यासाठी सर्व श्रद्धावान बौद्ध अनुयायांनी या धरणे आंदोलनात मोठ्या संख्येने सहभागी व्हावे. तसेच, सहभागी होणाऱ्या व्यक्तींनी पांढऱ्या शुभ्र वस्त्रांमध्ये उपस्थित राहावे असे आवाहन आयोजक तथा बुद्धगया महाबोधी महाविहार मुक्ती आंदोलन कृती समिती तालुका माजलगावच्या वतीने करण्यात आले आहे.

# संकल्प विद्या मंदिर येथे महिला दिन विविध उपक्रमाने संपन्न

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

अंबाजोगाई शहरातील संकल्प विद्या मंदिर येथे जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून विविध उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते यामध्ये पहिल्या सत्रामध्ये मध्ये संकल्प विद्यामंदिर शाळेला एक वेगळी ओळख निर्माण करून देणाऱ्या महिला शिक्षकांचा सन्मान करण्यात



आला. यावेळी प्रथम राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते माता ▶▶ उर्वरित पान २ वर

# बीडच्या रेशीम कोष खरेदी केंद्रात एकाच दिवसात विक्रमी 13 हजार 483 किलो रेशीम कोषाची आवक : संचालक धनंजय गुंदेकर

**बीड । प्रतिनिधी**

कृषी उत्पन्न बाजार समिती बीड येथील लोकनेते स्व. विनायकराव मेटे साहेब रेशीम कोश खरेदी केंद्रात काल दिनांक १० मार्च २०२५ रोजी तब्बल १३ टन रेशीम कोषाची आवक झाली आहे. रेशीम कोष खरेदी केंद्राबाबत राज्यभरात विश्वास संपादित झाला असून बारामती,



नाशिक, इंदापूर ते थेट विदर्भामधून रेशीम कोष विक्रीसाठी या खरेदी केंद्रात ▶▶ उर्वरित पान २ वर

रेशीम कोष बाजारपेठ, बीड
बाजारभाव -
दि:10/03/२०२५
लॉट १४६ (पांढरा कोष)
आवक :- वजन 13 हजार ४८3
किलो 100 ग्राम
बाजारभाव (प्रति किलो)
कमाल: ₹ ७3५
किमान: ₹ २00
सरासरी: ₹ ६3५

# ब्राह्मण समाज सभागृहाकरता निधी कमी पडू देणार नाही : आमदार प्रकाश सोळंके

### आई वडील सर्वश्रेष्ठ : योगानंद सरस्वती स्वामी

**माजलगाव । प्रतिनिधी**

माजलगाव मध्ये सामुदायिक उपनयन संस्कार हा कार्यक्रम समस्त ब्राह्मण समाजाने आयोजित केला हा स्तुत्य उपक्रम असून या ब्राह्मण समाजाच्या सभागृहाकरिता निधी कमी पडू देणार नाही असे आश्वासन आमदार प्रकाश सोळंके यांनी दिले तर सर्व समाजांनी आई-वडिलांना देवासमान मानून त्यांची सेवा करावी हीच ईश्वर सेवा आहे असे मत आदिलाबाद मठ संस्थानचे मठाधिपती योगानंद यांनी व्यक्त केले.



माजलगाव येथे आज दिनांक ९ मार्च रविवारी सामुदायिक उपनयन संस्कार कार्यक्रमाचे आयोजन समस्त ब्राह्मण समाजाच्या वतीने करण्यात आले होते . या कार्यक्रमास आमदार प्रकाश सोळंके , योगानंद सरस्वती स्वामी, माजी आमदार मोहनराव सोळंके, माजी आमदार राधाकृष्ण होके पाटील, मोहन जगताप ,बाबुराव पोटभरे, डी.के.देशमुख, नारायण डक अँड. भानुदास डक नितीन नाईकनवरे , संभाजी शेजुळ ,जयदत्त नरवडे, अमरनाथ खुरपे, अरुण राऊत, तुकाराम येवले, सुरेंद्र रेदासनी, अँड.कालिदास थिगळे, गजानन जोशी, अँड.मकरंद पत्की, डॉ. श्रीराम खळगे कचरू खळगे, डॉ. मधुकर घुबडे शरद यादव ,विजय शिंदे, यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी बोलताना आमदार प्रकाश सोळंके म्हणाले की माजलगाव येथील समस्त ब्राह्मण समाज सातत्याने विविध सांस्कृतिक धार्मिक कार्यक्रमांच्या आयोजन करतात. ब्राह्मण समाजाच्या परशुराम आर्थिक विकास महामंडळासाठी मी विधानसभेमध्ये लक्षवेधी देखील मांडली होती आज त्याला खऱ्या अर्थाने मूर्त स्वरूप प्राप्त झाले आहे, आगामी काळात देखील ब्राह्मण समाज करिता सभागृह उभारण्यासाठी निधीची कमी पडू देणार नाही अशी ग्वाही त्यांनी यावेळी दिली. यावेळी आशीर्वाचन पर मार्गदर्शन करताना आदीलाबाद येथील राम कृष्ण मठ संस्थानचे मठाधिपती योगानंद सरस्वती स्वामी म्हणाले की ब्राह्मण समाजाने दिशा देण्याचे काम आजपर्यंत केलेले आहे , असे असले तरी देखील गायत्री मंत्राची उपासनना करण्याची गरज आहे. सामुदायिक उपनयन संस्कार कार्यक्रमात एकोणवीस बटुंवर

▶▶ उर्वरित पान २ वर